cmyk

## संपादकीय

### नेमके चित्र जाणण्यासाठी जातीनिहाय जनगणना महत्वाची

यावेळच्या जनगणनेत जातीचीही विचारणा केली जाईल, असा महत्वपूर्ण निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाचे दूरगामी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम होणार आहेत. अशी जनगणना व्हावी अशी मागणी बऱ्याच काळापासून विविध समाजघटकांकडून आणि राजकीय पक्षांकडून केली जात होती. अशी जनगणना ब्रिटीशांच्या काळात केली जात होती.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### सातबाऱ्यावरील कालबाह्य, निरुपयोगी नोंदी हटविण्याचे महसूलमंत्र्यांचे आदेश

मुंबईः राज्यात जिवंत ७/१२ मोहिमे'चा दुसरा टप्पा सुरू होणार आहे. सातबाऱ्यावरील कालबाह्य, निरुपयोगी नोंदी हटवण्यास महसूल विभागाला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आदेश दिले आहेत. कालबाह्य नोंदींमुळे शेतकऱ्यांना कर्जप्रकरणे, जमिनीच्या खरेदीविक्री व्यवहारात तसेच शासकीय योजनांच्या लाभात अडचणी येत होत्या. त्यामुळे या मोहिमेअंतर्गत तलाठ्यांना संबंधित फेरफार नोंदी घेऊन जुने बोजे व शेरे कमी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही मोहीम शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष –५ अंक–१३ शनिवार, दि.३ मे २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

# शेतकरी कर्जमाफीवरून अजित पवारांनी हात झटकले

## मी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते का म्हणत केला उलट सवाल



### डीसीएम टू सीएम आंदोलनाची घोषणा, बारामतीतून सुरुवात तर नागपुरात शेवट बच्चू कडू

कर्जमाफीच्या मुद्द्यावर प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. कडू यांनी पुढच्या महिन्यापासून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. बच्चू कडू यांनी डीसीएम टू सीएम अशा आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनांतर्गत बच्चू कडू २ जूनला बारामतीत अजित पवारांच्या घरासमोर अर्थसंकल्प वाचन आंदोलन करत त्यांना कर्जमाफीची आठवण करुन देणार आहेत. बारामतीत सुरु करणाऱ्या आंदोलनाचा शेवट नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलन करुन केला जाणार असल्याची माहिती कडू यांनी दिली आहे. बच्चू कडू पुढे टप्प्याटप्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी कर्जमाफीच्या मुद्द्यावर नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलनाची घोषणा त्यांनी केली आहे.

कोल्हापूर । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकीत शेतकरी कर्जमाफीचा वादा केलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आता मात्र शेतकरी कर्जमाफीवरून हात झटकले आहेत. मी कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं का'', असे स्पष्टीकरण देत अजित पवारांनी शुक्रवारी (दि.२) कर्जमाफीला बगल दिली आहे.**

कोल्हापूरमधील एका कार्यक्रमात अजित पवारांना कर्जमाफीवरून माध्यमांना प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देणेअजित पवारांनी टाळले. परंतु कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले होते? मी दिले होते का? असा प्रतिप्रश्न अजित पवारांनी माध्यमांना केला. परंतु ६ नोव्हेंबर २०२४ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसने महाराष्ट्रवादी घोषणापत्र या नावाने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे अजित पवारांना घोषणापत्राचा विसर पडला का, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करू लागले आहेत. महायुती सरकारच्या घटक पक्षांनी शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी चंद्रपूर आणि नाशिक जिल्ह्यातील प्रचारसभेत शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची घोषणा केली होती. तर महायुतीच्या जाहीरनाम्यातही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीची प्रतिक्षा करत आहेत. परंतु अजित पवारांनी पुन्हा एकदा कर्जमाफीला नकार दर्शवत कर्जमाफीचे आश्वासन दिले नव्हते, असा घुमजावही केला आहे. यापूर्वीही उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दौंड येथील पान २ वर

### मग आश्वासन का दिले – राजू शेट्टी

राज्यात शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षाने कर्जमाफीवरून रान तापवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यासाठी सत्ताधारी महायुती सरकारवर टिकास्त्र सोडले जात आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी शेतकरी कर्जमाफीवरून सरकारवर गुरुवारी जोरदार टिका केली. कर्जमाफी देणे होत नव्हती, तर मग आश्वासन का दिले, असा सवाल शेट्टी यांनी राज्य सरकारला केला आहे.

# राहुल, सोनिया गांधींसह ६ जणांना कोर्टाची नोटीस

दिल्ली । वृतसंस्था

**नॅशनल हेराल्ड मनी लाँड्रिंग प्रकरणात दिल्लीतील एका न्यायालयाने शुक्रवारी (दि.२) लोकसभेतील विरोधी पक्षनेते, काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना नोटीस बजावली. काँग्रेसच्या निकटवर्तीयांसह इतर ६ जणांनादेखील नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ मे रोजी होणार असल्याचेदेखील न्यायालयाने म्हटले आहे.**




विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. न्यायाधीश गोगणे म्हणाले की, सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) त्यांच्या आरोपपत्रात ज्यांची नावे दिली आहेत, त्यांना नोटीस बजावताना सुनावणी घेण्याचा अधिकार आहे. नॅशनल हेराल्ड प्रकरण हे काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डचे मालक असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांना ५० लाख रुपयांच्या मोबदल्यात यंग इंडियनला दिलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जाशी संबंधित आहे. पान २ वर

# 'एआय' आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला नेतृत्वाची संधी – मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

**जागतिक स्तरावर मनोरंजनक्षेत्रात 'एआय'चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे 'एआय' तंत्रज्ञानची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आता 'एआय' आणि मनोरंजन क्षेत्राचे जागतिक नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



वेव्हज परिषदेदरम्यान महाराष्ट्र पॅव्हेलियन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज परिषदेचे आयोजन केले आणि त्याचे यजमानपद महाराष्ट्राकडे दिले राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने काही अत्यंत महत्त्वाचे सामंजस्य करार केलेले आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा, एनएसईने वेव्हज निर्देशांक सुरू केलेला पान २ वर

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी तरुणाला २० वर्षांचा कारावास

केज । प्रतिनिधी

**अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवू तिला पळवून नेऊन तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार बळजबरीने लैंगिक संबंध ठेवल्या प्रकरणी केज सत्र न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत २० वर्ष कारावास आणि ५५ हजारांचा दंड ठोठावला. या प्रकरणाची सुनावणी सत्र न्यायाधीश कुणाल डी. जाधव यांच्या न्यायालयात झाली.**

याबाबतची अधिक माहिती अशी की, १७ जानेवारी २०२२ रोजी केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत १६ वर्ष वयाची अल्पवयीन मुलगी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पाणी भरण्यासाठी गेली असता तिला लग्नाचे आमिष दाखवून आरोपी शकील महंमद मुलानी (रा. दुधगाव, ता. जि. धाराशिव) याने तिला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेले होते. या प्रकरणी पीडित मुलीच्या भावाच्या तक्रारी वरून आरोपी विरुद्ध युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. संदीप दहीफळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक पिंपळे हे तपास करीत होते. तपासा दरम्यान पीडितेचा शोध घेतला असता पीडिता ही जामगाव येथे आरोपी शकील महम्मद मुलानी याच्यासोबत मिळून आली. पीडितेकडे विचारपूस केली असता दि. १७ जानेवारी २०२२ रोजी आरोपीने पीडितेस लग्नाचे आमिष दाखवून तिला कर्नाटक राज्यातील लोकापूर, पान २ वर

### विकसित राष्ट्र निर्माणात महाराष्ट्राचे योगदान महत्वाचे - राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन

मुंबई । प्रतिनिधी



राज्यातील सर्व समाजघटकांना सोबत घेऊन सर्वसमावेशक, प्रगतिशील, पुरोगामी आणि विकसित राष्ट्र घडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. भारताच्या अमृत काळामध्ये भारताला 'विकसित राष्ट्र' बनविण्याचे ध्येय साध्य करताना महाराष्ट्राचे योगदान महत्वाचे असेल. महाराष्ट्राला आधुनिक, बलशाली आणि प्रगत राज्य बनविण्यासाठी आपण सर्वांनी काम करूया, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आयोजित मुख्य शासकीय पान २ वर

# मराठवाड्यासाठी १९६८ कोटी रुपये विमा भरपाई मंजूर!

### २०२४ मधील पीक नुकसानीपोटी भरपाई मिळण्यास सुरूवात

संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना खरिप हंगाम २०२४ मधील पीक नुकसानीपोटी विमा भरपाई मंजूर झाली आहे. पीक विम्याची ३० एप्रिलपर्यंत १ हजार ९६८ कोटी रुपये भरपाई मंजूर झाली. त्यापैकी १ हजार ६६७ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. तर उरलेले ३०१ कोटी रुपये जमा करण्याचे काम सुरु आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना भरपाई मंजूर झाली. यापैकी नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या दोन्ही ट्रीगरमधून भरपाई मंजूर झाली. तर इतर जिल्ह्यांमध्ये केवळ स्थानिक नैसर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून भरपाई मंजूर झाली. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये ३० एप्रिलपर्यंत एकूण पान २ वर

# पुढील २ दिवसांत लाडक्या बहिणींना मिळणार एप्रिलचा हप्ता

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मार्च आणि एप्रिल महिन्यांच्या हप्त्याची राज्यातील कोट्यवधी महिलांना प्रतीक्षा आहे. दरम्यान मार्च महिन्याचा उल्लेख टाळत एप्रिल महिन्याचा हप्ता लाडक्या बहिणींच्या खात्यात येत्या २ ते ३ दिवसांत जमा होईल अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी शुक्रवार दि. २ मे रोजी येथे दिली.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. तर, ज्या लाडक्या पान २ वर

# कोठारबन येथील भगवान बाबा मंदिरावरील सोन्याचा कळस चोरीला; ग्रामस्थांत संतापाची लाट

वडवणी । प्रतिनिधी

**तालुक्यातील कोठारबन गावातील श्रद्धेचं आणि भक्तीचं प्रतीक असलेला राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मंदिरावरील सोन्याचा कळस अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सदर घटना २६ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**

सदर कळस २०१६ मध्ये गावातील मुली आणि ग्रामस्थांच्या देणगीतून तयार करण्यात आला होता. याच वर्षी कोठारबन येथे श्री क्षेत्र भगवान गडाचा फिरता नारळी सप्ताह आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी कोठारबन ग्रामस्थांनी विक्रमी एक कोटी तीन लाख रुपयांची पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ९९.५० क्विंटल | २,३०१ | ३,०४१ | २,७३३ |
| ज्वारी/हायब्रिड: ९५.०० क्विंटल | १,७५० | २,६८६ | २,२६४ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१२५ | २,१२५ | २,१२५ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०१ | ६,६०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: २२०.०० क्विंटल | १,९७६ | २,९३० | २,५०५ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: १२.५० क्विंटल | ५,४०० | ५,४३० | ५,४०९ |

# पशूसंवर्धन खात्याच्या माध्यमातून ग्रामीण तरुणांना उद्योजक बनवायचयं

## पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत परळीत प्रथमच पशूपालकांची एकदिवसीय कार्यशाळा ; योजनेच्या पोर्टलचेही केले उदघाटन



### ना.पंकजाताईंनी केले तरूण उद्योजकांना बोलते

पशुसंवर्धन विभागाच्या योजनेचा लाभ घेऊन यश मिळवणारे ग्रामीण भागातील अनेक तरूण उद्योजक या कार्यशाळेस उपस्थित होते, ना. पंकजाताई मुंडे यांनी भाषणाला सुरवात करण्यापूर्वी काही तरूणांना स्वतः व्यासपीठावर बोलवून घेतले व त्यांना आपले अनुभव कथन करण्यास सांगितले. या तरुणांनी सांगितलेले आपले अनुभव उपस्थितांना प्रेरणा देणारे ठरले. पंकजाताईंच्या हस्ते यावेळी या तरूण उद्योजकांचा व उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेस जिल्हा पशूसंवर्धन उपायुक्त डॉ आर डी कदम, पशुसंवर्धन अधिकारी डॉ देशमुख, सह आयुक्त डॉ पांडे, गट विकास अधिकारी संजय केंद्रे, पशूधन विकास अधिकारी डॉ प्रकाश आघाव आदी उपस्थित होते.

### लखपती उद्योजक संकल्पना

लखपती दीदी योजने सारख्या लोकाभिमुख संकल्पनेप्रमाणे पशूपालकांना लखपती जोडपे अशी ओळख मिळवून देण्याचा आपला मानस असल्याचेही ना. पंकजाताई यावेळी म्हणाल्या. अशा अनेक योजना आपण पशूसंवर्धन मार्फत राबवत आहोत, या योजनांचा अधिकाधिक फायदा घ्या, कार्यशाळेला विभागाच्या अभ्यासू अधिकाऱ्यांची टीम उपस्थित आहे, त्यांच्याकडून माहिती मिळवून इतरांनाही योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांनी याप्रसंगी केले.

परळी वै.। प्रतिनिधी

**पशूसंवर्धन विभागामार्फत पशूपालन आणि शेतीशी निगडित अनेक चांगल्या योजना राबविल्या जात आहेत. विभागांतर्गत सुरु असलेल्या योजनांतून ग्रामीण भागातील तरुणांना उद्योजक आणि लखपती बनवायचे आहे. तरुणांना स्वावलंबी बनवणाऱ्या वेगवेगळ्या योजना राबवून 'ग्रामीण उद्योजक' अशी ओळख जिल्ह्यातील तरुणांना मिळवून देऊ असा विश्वास राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे व्यक्त केला.**

महाराष्ट्र शासनाच्या पशूसंवर्धन विभाग आणि राष्ट्रीय पशूधन अभियातंर्गत शहरात प्रथमच आज पशूपालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी जिल्ह्यातील पशू पालकांशी संवाद साधताना उदघाटन पर भाषणात ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. पशूसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, जिल्हा परिषदेचे पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# नेमके चित्र जाणण्यासाठी जातीनिहाय जनगणना महत्वाची

यावेळच्या जनगणनेत जातीचीही विचारणा केली जाईल, असा महत्वपूर्ण निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाचे दूरगामी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम होणार आहेत. अशी जनगणना व्हावी अशी मागणी बऱ्याच काळापासून विविध समाजघटकांकडून आणि राजकीय पक्षांकडून केली जात होती. अशी जनगणना ब्रिटीशांच्या काळात केली जात होती. १९३१ नंतर मात्र, भारतात अशी जनगणना झाली नाही. त्यामुळे कोणत्या जातीची जनसंख्या किती आहे, हे समजून घेण्यासाठी १९३१ च्या जनगणनेचाच संदर्भ घेतला जात होता. २०११ मध्ये जातीनिहाय जनगणना झाली, तथापि, तिचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला नव्हता. आता केंद्र सरकारने जो निर्णय घेतला आहे, त्याचे श्रेय घेण्याचा विरोधकांचा, विशेषत: काँग्रेसचा प्रयत्न आहे. आमच्या दबावामुळे केंद्र सरकारला हा निर्णय घ्यावा लागला, असे या पक्षांचे म्हणणे आहे. तथापि, तो केवळ एक राजकीय अपप्रचार आहे. कारण काँग्रेसने या देशावर ५५ वर्षे राज्य केले आहे. तथापि, एकदाही या पक्षाने आपल्या सत्ताकाळात जातीनिहाय जनगणना केली नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०१९ नंतर यात पुढाकार घेतला. तथापि, त्यांनीही २०११ च्या जनगणनेचा अहवाल प्रसिद्ध करा, असा आग्रह त्यावेळचे पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्याकडे धरला नव्हता. इतर जात्याधारित पक्षही अनेकदा देशात किंवा राज्यांमध्ये सत्तेवर आले होते. पण त्यांनीही असा निर्णय घेतला नव्हता. त्यामुळे केंद्राच्या या निर्णयाचे श्रेय त्या सरकारलाच देणे योग्य ठरणार आहे.

दुसरा मुद्दा जातीनिहाय जनगणना आवश्यक आहे काय, हा आहे. भारतात अनेक जाती आहेत. जातींमध्येही उपजाती आणि पोटजाती आहेत. त्यामुळे प्रत्येक जातीची नेमकी जनसंख्या किती, विश्वासार्ह पद्धतीने जाणून घेणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे विशिष्ट जनसमुदायाची आर्थिक आणि सामाजिक स्थिती काय आहे, हेही पुढच्या धोरणांच्या निश्चितीसाठी आवश्यक आहे. त्यामुळे भारताची जातिनिहाय परिस्थिती समजून घेण्यासाठी अशा पद्धतीची जनगणना करणे योग्य मानले पाहिजे. कारण नेमके चित्र त्याखेरीज स्पष्ट होणार नाही. जातीनिहाय जनगणना झाल्यानंतर काय, हा आणखी एक प्रश्न आतापासूनच उपस्थित केला जात आहे. या प्रश्नाचे एक सरळसोट उत्तर नाही. पुढे काय होणार, हे प्रत्येक जातीची लोकसंख्या समोर आली, की ठरणार आहे. जातींचा संबंध आरक्षणाशी आहे. हा प्रश्न विविध जातींचे लोक आणि नेते किती सामंजस्याने सोडवितात, यावर या जनगणनेचे यशापयश अवलंबून आहे. या प्रश्नाच्या अनेक साधक-बाधक बाजू आहेत. त्यांचा समतोल विचार करुन सुवर्णमध्य काढणे आवश्यक ठरणार आहे. कारण एकाच वर्गातील अनेक जातींचे सामाजिक स्थान, आर्थिक परिस्थिती आणि शैक्षणिक स्थिती यांमध्ये मोठे अंतर आहे. एकाच जातीतील अनेक पोटजातींच्या स्थितींमध्येही अशाच प्रकारचे अंतर आहे. जात हा घटक वरुन एकसंध भासत असला तरी, प्रत्यक्षात तो तसा एकजिनसी नसतो. त्यामुळे, एकदा सर्व जाती-पोटजातींची नेमकी संख्या समोर आली, की सध्या असलेले अंतर्विरोध आणि विसंगती वाढू नयेत, हे पाहण्याचे उत्तरदायित्व प्रत्येकावर असेल. यामध्ये जर राजकारणाचा शिरकाव झाला आणि प्रत्येक राजकीय पक्षाने राजकीय नफातोट्याच्या हिशेबातून याकडे पहायचे असे धोरण धरले, तर मात्र, समाजामध्ये मोठा गोंधळ माजू शकतो याची जाणीव प्रत्येक संबंधिताने ठेवणे आवश्यक ठरणार आहे. जातीनिहाय जनगणना करणे सोपे आहे. पण तिचा परिणाम हाताळण्यासाठी, मोठ्या समंजसपणाची आणि एकमेकांना समजून घेण्याची आवश्यकता भासणार आहे. हा भाग व्यवस्थितरित्या हाताळला गेल्यास अशी जनगणना समाजाच्या लाभाची ठरु शकते.

जातीनिहाय जनगणनेच्या संदर्भात आणखी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला जातो. तो 'धर्म' हा आहे. ज्या प्रमाणे हिंदू धर्मात जाती आहेत, त्याचप्रमाणे भारतापुरते बोलायचे झाल्यास प्रत्येक धर्मात जाती आहेत. सध्या 'धर्माच्या नावाने ध्रुवीकरण' हा मुद्दा मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. एकदा जातीचा मुद्दा पुढे आला की, धर्माचा मुद्दा आपोआप मागे जाईल. मग भारतीय जनता पक्ष किंवा तत्सम 'धर्माधारित' पक्षांची कोंडी होईल, अशी गोड गैरसमजूत अनेक पुरोगामी म्हणवून घेणाऱ्यांचीही असते. स्वत:ला धर्मनिरपेक्ष मानणाऱ्या, पण जातींच्या आधारावर विसंबून असलेल्या अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांचीही तशी अंधश्रद्धा असते. तथापि, तसे काही होण्याची शक्यता दिसत नाही. या सर्वाचा विचार करुनच केंद्रातील भारतीय जनता पक्षप्रणित सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला असावा. अर्थात, जातीनिहाय जनगणना झाल्यानंतर, कोणता पक्ष कशाप्रकारे त्याला हाताळतो, यावर बरेच अवलंबून असेल. हिंदू समाजापुरते बोलायचे, तर जात आणि हिंदू धर्म अशा दोन्ही बाबी मानणाऱ्यांची मोठी संख्या हिंदू धर्मात आहे. त्यामुळे या दोन्ही बाबी एकमेकींना पूरकही ठरु शकतात.

# विकासाच्या प्रक्रियेत राज्य शासन शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या पाठिशी-पालकमंत्री पंकजा मुंडे

जालना । प्रतिनिधी

**राज्य शासन विविध कल्याणकारी योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे जीवन सुखकर करण्याचा प्रयत्न करत असून, विकासाच्या प्रक्रियेत राज्य शासन शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या पाठिशी सदैव उभे असल्याचे, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.**



महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर श्रीमती मुंडे यांच्या हस्ते आज मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी खासदार कल्याण काळे, आमदार अर्जुन खोतकर, भास्करराव पाटील दानवे, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदिश मिनियार, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी योगदान व बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात, महान विभूतींना मी सर्वप्रथम अभिवादन करते. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेंव्हा पासूनच आपल्या महाराष्ट्र राज्याने सर्वच क्षेत्रामध्ये विकासाची मोठी भरारी घेऊन विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. त्यामुळेच आज आपले महाराष्ट्र राज्य देशातील अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे जालना जिल्हा देखील अग्रेसर राहिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि राज्याचे नाव देशात अग्रेसर ठेवण्यासाठी राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाचा १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून, ठोस कामगिरी करण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक वसुंधरा दिन' निमित्त पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात २२ एप्रिल ते महाराष्ट्र दिन १ मे, २०२५ या कालावधीत 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला. या उपक्रमातंर्गत सर्वांनी आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील, पाण्याचे विविध स्त्रोत साफ केले आहेत. नद्या, नाले, तलावांची स्वच्छता केली. तसेच जालना शहरातून वाहणाऱ्या सीना-कुंडलिका नदी पात्रात मोठ्या प्रमाणात झालेली अतिक्रमणे काढून नदीची स्वच्छता करण्याचे काम करण्यात येत असल्याच त्यांनी सांगितले. नागरिकांमध्ये जल साक्षरता वाढवणे, पाण्याच्या बचतीचे महत्व पटवून देणे आणि जल व्यवस्थापनाच्या शाश्वत उपाययोजना राबविण्यासाठी जलसंपदा विभागाच्यावतीने १५ ते ३० एप्रिल या कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवडा' साजरा करण्यात आला. या जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या माध्यमातून समाजात पाण्याच्या सुयोग्य वापराबाबत विविध उपक्रमाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात आली. जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात पाणी टंचाईकरिता आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. टँकर, पुरक नळ योजना, विहिर अधिग्रहण इत्यादी या उपाययोजनांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना पाणी टंचाईचा त्रास होणार नाही. याबाबतच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या आहेत. कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची 'ॲग्रिस्टॅक' योजना राज्यात राबविण्यात येत असून, जिल्ह्यात सदर योजनेची अमंलबजावणी जलद गतीने सुरु आहे. जिल्ह्यात या योजने अंतर्गत सुमारे ३ लाख शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. 'ॲग्रीस्टॅक' योजने अंतर्गत आपली नोंदणी आपली नोंदणी करुन घेण्याचे आवाहन पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी केले.



## पिंपळवाडी विद्यालयात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा

नवगण राजुरी । प्रतिनिधी

**पिंपळवाडी माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप हे होते.**

याप्रसंगी प्रथम मुख्याध्यापक व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून मुख्याध्यापक प्रदीप जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच सुभाष बहिरवाळ, श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ, उपसरपंच गणेश बहिरवाळ, पो. पाटील अर्जुन बहिरवाळ, महादेव पाटील, हरिभाऊ भोसले, किशोर तुपे, हनुमान कळसाने, मधुकर पाटील, बाळासाहेब कळसाने, विश्वास पाटील, शिवप्रसाद कळसाने, कल्याण ठोकळ, अशोक पाटील, साहेबराव साळवे, रवींद्र कळसाने, संतोष वाघुले, पो. कॉ. नारायण खटाणे, डॉ.नेमाणे, तसेच शाळेचे माजी विद्यार्थी, पालक, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी नदीवरचे कॅनॉल दरवाजे उघडून शेतकऱ्यांसाठी सोडले पाणी, सतीश घाटगे पाण्यासाठी आक्रमक



जालना । प्रतिनिधी

**अंबड जायकवाडीच्या पाण्यावरून पेटलेल्या असंतोषाचा ज्वालामुखी शुक्रवारी उसळला! समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन आणि भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांनी तहानलेल्या गावांसाठी आक्रमक भूमिका घेत थेट गोदावरी नदीच्या कॅनॉलचे दरवाजे उघडले. शेकडो शेतकऱ्यांच्या साथीनं घाटगे पाटलांनी गुळज आणि तळनेवाडी येथील कॅनॉलचे अडथळे झुगारून लावले आणि हक्काचं पाणी गोदावरीच्या पात्रात सोडलं.**


> घनसावंगी -अंबड तालुक्यातील दुष्काळी गावांची परिस्थिती लक्षात घेऊन पाट बंधारे विभागाने लवकरच हे पाणी सोडायला पाहिजे होत. परंतु पाट बंधारे विभागाच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांना वेठीस धरण्यात येत आहे. आम्ही सरकारला बदनाम होऊ देणार नाही. त्यामुळे शेतकरी हितासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. येत्या दोन दिवसात मंगरूळ , शिवनगाव, जोग्लादेवी बंधाऱ्यात एस्केप गेट उघडून पिण्यासाठी पाणी न सोडल्यास तिथले एस्केप गेट उघडून आम्ही पाणी खुले करणार आहोत.
>
> **-सतीश घाटगे पाटील, भाजपा नेते तथा चेअरमन समृद्धी शुगर्स**

अंबड-घनसावंगी तालुक्यात भीषण पाणीटंचाई असताना, पिण्याच्या पाण्यासाठी आणि मुक्या जनावरांसाठी त्राहिमाम असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी मात्र डोळेझाक करत होते. जायकवाडी धरणात पुरेसा साठा असूनही गोदाकाठच्या गावांना कॅनॉलद्वारे पाणी सोडण्यात चालढकल केली जात होती. या प्रशासकीय उदासिनतेमुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला होता. अखेरीस, सतीश घाटगे पाटील यांनी या असंतोषाचं नेतृत्व करत थेट मैदानात उतरण्याचा निर्धार केला. शुक्रवारी, त्यांनी शेकडो शेतकऱ्यांना एकत्र करत गोदावरी नदीच्या उजव्या कालव्यावरील गुळज आणि तळनेवाडी कॅनॉलकडे कूच केली. संतप्त शेतकऱ्यांच्या रेट्यापुढे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे सारे प्रयत्न निष्फळ ठरले. घाटगे पाटील आणि शेतकऱ्यांनी स्वतः कॅनॉलचे दरवाजे उघडले आणि अडवलेलं पाणी अखेर गोदावरीच्या दिशेने मार्गस्थ झालं. या निर्णायक क्षणी शेतकऱ्यांनी एकच जल्लोष केला आणि घाटगे पाटलांच्या हिमतीला सलाम केला. या आंदोलनात भाजपा तालुका प्रमुख शिवाजी मोरे, आसेफ कुरेशी, दत्ता लोने यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### अधिकाऱ्यांची झाली बोलती बंद!

कॅनॉलचे दरवाजे उघडले जात असताना, धावतपळत आलेल्या पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतीश घाटगे पाटील यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. शेतकऱ्यांची व्यथा आणि प्रशासनाची निगरगट्ठ भूमिका त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडली, ज्यामुळे अधिकाऱ्यांची बोलती बंद झाली. संतप्त शेतकऱ्यांनीही अधिकाऱ्यांवर आपला रोष व्यक्त केला. ''धरणात पाणी असूनही जर आमच्या शेतकऱ्यांच्या जनावरांना प्यायला पाणी मिळत नसेल, तर या कॅनॉलच्या पाण्याचा काय उपयोग? अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शेतकरी आणि गावकरी पाण्यासाठी तडफडत आहेत. म्हणूनच आम्हाला हे पाऊल उचलावे लागले,'' असे खडे बोल घाटगे पाटील यांनी सुनावले.

# परतूर शहरामध्ये मटका घेणाराची व खेळणाराची संख्या वाढली?



परतूर । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांनी परतुर तालुक्यात लक्ष देण्याचे मागणी लाडक्या बहिणीकडून करण्यात येत आहे. परतुर शहरासह ग्रामीण भागात मटका आणि जुगार अड्डा जोरात सुरू असून यामध्ये मटका घेणाराची व खेळणाऱ्यांची संख्या वाढत आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी लक्ष देणे गरजेचे आहे असे पण मागणी होत आहे. याप्रकरणी पोलिस अधिकारी यांनी लेखी तक्रार दिली असून पोलिस प्रशासन शांत का मटका चालवणारे व पोलिस प्रशासन यांची हात मिळवणी आहे का असा प्रश्न उपस्थित होत आहे .**

जुनी पोलिस चौकी हिच्या मागच्या बाजूस एका हॉटेलमध्ये राधाकिसन रोकडे, रा. साठेनगर परतूर जुगार मटका चालवत आहेत व मोंढा भागातील जुनी पोलीस चौकीच्या परिसरात ३ ते ४ ऐजंट व होलाणी दालमिल, तसेच रेल्वे स्टेशन परिसर व रेल्वे गेटच्या बाहेर आष्टी रोड या परिसरामध्ये सदरचे ऐजंट लोक कोणालाही न घाबरता, सर्रासपणे रस्त्यावर खुलेआम कल्याण मुंबई व मिलन नावाचा अवैध जुगार मटका घेत आहेत. सदर अवैध धंदे करणारे लोकांवर पोलीसांचा काहीएक धाक राहिलेला नाही. त्यामुळे सामान्य गोरगरीब लोक दिवसभर काम करून त्यांची आलेली रक्कम या अवैध धंदे मटक्यामध्ये गुंतवत आहेत व त्यांच्या संसाराची धुळधान करत आहे, त्यामुळे त्यांचे कुटूंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदरचे अवैध धंदा मटका जुगार यांच्यावर पोलिस प्रशासन काय कारवाई करणार कुठली ॲक्शन घेणार का मटका चालवणारे यांची पाठराखण करणार का कारवाई करणार असे बोलले जात आहे

## पान १वरून...

### शेतकरी कर्जमाफीवरून

सभेतही शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन आपण दिल्याचे ऐकले का, असा सवाल उपस्थित शेतकऱ्यांना केला होता. तसेच शेतकऱ्यांनी पीक कर्ज भरावीत, असे सांगून कर्जमाफी होणार नसल्याचे संकेत मार्च महिन्यात माळेगाव साखर कारखान्यावर बोलताना पवारांनी दिले होते. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीला अजित पवारांचा विरोध असल्याची चर्चा रंगली होती. त्यात आता अजित पवारांनी कर्जमाफीवरून हात झटकल्याने शेतकरी मात्र संताप व्यक्त करू लागले आहेत.

-----------

### 'एआय' आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला

आहे. ४३ कंपन्या, या दृकश्राव्य क्षेत्रातल्या आहेत, या कंपन्यांचा निर्देशांक सुरू झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करत आणि एकूणच फायनान्शियल इकोसिस्टीम तयार करण्याकरिता हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. हा वेव्हज इंडेक्स म्हणजे वेव्हजच्या यशामधला एक मुकुटमणी असल्याचे सांगितले.

------------

### राहुल, सोनिया गांधींसह

एका इक्विटी व्यवहारात २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मालमत्तेचा गैरवापर झाल्याचा आरोप आहे. माजी केंद्रीय मंत्री सुब्रमण्यम स्वामी यांनी त्यांच्या खाजगी तक्रारीत सोनिया गांधी, राहुल गांधी, मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सुमन दुबे, सॅम पित्रोदा आणि गांधी कुटुंबाच्या नियंत्रणाखालील यंग इंडियनवर फसवणूक, गुन्हेगारी कट, गुन्हेगारी विश्वासघात आणि मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. ईडीने या वर्षी १५ एप्रिल रोजी गांधी कुटुंबासह काँग्रेस नेते सॅम पित्रोदा आणि इतरांविरुद्ध खटला दाखल केला होता.

-----------

### मराठवाड्यासाठी १९६८

१ हजार ९६८ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली. त्यापैकी १ हजार ६६७ कोटी रुपये जमा झाले. तर स्थानिक नैगर्गिक आपत्ती या ट्रीगरमधून १ हजार २५५ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली. त्यापैकी ३० एप्रिलपर्यंत ९६५ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले. हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या ट्रीगरमधून ७१३ कोटी रुपयांची भरपाई मंजूर आहे. त्यापैकी ७०२ कोटी रुपये जमा झाले.

**मराठवाड्यातील जिल्ह्यांना मंजूर झालेली रक्कम**

छत्रपती संभाजीनगर - ८५ कोटी १६ लाख रुपये भरपाई मंजूर झाली. , जालना - १९७ कोटी रुपये भरपाई मंजूर आहे., बीड - २८२ कोटी रुपयांची भरपाई मंजूर झाली., लातूर - २२७ कोटींची भरपाई मंजूर आहे., धाराशिव - २३१ कोटी रुपयांची विमा भरपाई मंजूर झाली., नांदेड - १०३ कोटी आणि अग्रिम भरपाईचे २५८ कोटी असे एकूण ३६१ कोटी रुपयांची भरपाई मंजूर आहे., परभणी - १०३ कोटी रुपये आणि अग्रिम भरपाईचे २९९ कोटी रुपये असे एकूण ४०२ कोटी रुपये भरपाई मंजूर आहे., हिंगोली - १५४ कोटी रुपये मंजूर झाले.

----------

### विकसित राष्ट्र निर्माणात महाराष्ट्राचे योगदान

ध्वजवंदन कार्यक्रमात केले. कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, विधान परिषद सभापती प्रा.राम शिंदे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, स्थानिक लोकप्रतिनिधी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, बृहन्मुंबई आयुक्त भूषण गगराणी,पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, शासनाच्या विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, पोलीस आयुक्त देवेन भारती, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) मल्लिकार्जुन प्रसन्न, अपर मुख्य सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी मनीषा म्हैसकर, विविध विभागांचे प्रधान सचिव, वरिष्ठ शासकीय आणि पोलीस अधिकारी, तिन्ही सैन्य दलांचे वरिष्ठ अधिकारी, विविध देशांचे वरिष्ठ राजनैतिक अधिकारी, आदी यावेळी उपस्थित होते. यावेळ राष्ट्रगीत आणि राज्यगीत गायनाने मानवंदना देण्यात आली.

-----------

### कोठारबन येथील भगवान बाबा मंदिरावरील

देणगी भगवानगड संस्थानाला दिली होती. भगवानगडास इतकी मोठी देणगी देणारे कोठारबन हे पहिलेच गाव ठरले होते. भगवान बाबा मंदिरावरील कळस हा अत्यंत भव्य दिव्य होता. त्यावर आठ ते दहा तोळे सोन्याचे पॉलिश केलेले होते. याशिवाय कळसामध्ये १ ते २ लाख रुपयांची नगदी रोकड सुद्धा ठेवण्यात आली होती. गावातील अनेक मुली आणि ग्रामस्थांनी कळसात आपले दागिने अर्पण केले होते. सध्याच्या बाजारभावानुसार कळसाची किंमत अंदाजे ८ ते १० लाख रुपये इतकी असल्याचे सांगितले जाते. गावात २६ एप्रिल रोजी रात्री उशिरापर्यंत धार्मिक कार्यक्रम सुरू होता. रात्री १ वाजेपर्यंत अनेक ग्रामस्थांनी मंदिरावर कळस पाहिल्याचे सांगितले आहे. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी काही ग्रामस्थांना कळस गायब झाल्याचे निदर्शनास आले. हा कळस मंदिरावर बसवताना पाच जणांनी धरून उचलावा लागला होता, त्यामुळे चोरांनीही ४-५ जणांच्या टोळक्याने ही चोरी केली असावी, असा अंदाज व्यक्त होत आहे. तसेच गावातील काही भुरट्या चोरांचा यामध्ये हात असण्याची शक्यता ग्रामस्थांनी वर्तवली आहे.

**पोलिसांसमोर आव्हान**

या घटनेनंतर वडवणी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोठारबन येथील ग्रामस्थांमध्ये या चोरीबाबत संतापाची भावना आहे. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला असून चोरट्यांचा शोध घेणे हे वडवणी पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. या घटनेने कोठारबन गावात भीतीचं आणि नाराजीचं वातावरण निर्माण झालं असून श्रद्धास्थानावर अशा प्रकारे हात घालणाऱ्या चोरांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

--------------

### अल्पवयीन मुलीवरील अत्याचारप्रकरणी

त्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील सापटने (ता. माढा) येथे वीटभट्टीवर तसेच जामगाव (ता. बार्शी) येथील वीटभटटीवर नेले. तेथे तिच्या सोबत तिची संमती नसताना शारीरिक संबंध ठेवले. या प्रकरणी बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करून सत्र न्यायालय केज येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकूण ७ साक्षीदार तपासण्यात आले. या प्रकरणात सहाय्यक सरकारी वकिल ॲड. राम बी. बिरंगळ यांनी काम पाहिले. त्यांना सहाय्यक सरकारी वकिल ॲड. आर. पी. उदार आणि ॲड. सचिन चौधरी यांनी सहकार्य केले. तसेच त्यांना पैरवी अधिकारी महिला पोलीस नाईक राणी बनसोडे यांनी सहकार्य केले.

----------

### पुढील २ दिवसांत लाडक्या

बहिणींना पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधीचे एकूण १२ हजार रुपये मिळतात त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा ५०० रुपये दिले जाणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या महत्वाकांक्षी योजनेअंतर्गत एप्रिल महिन्याचा सन्मान निधी पात्र लाभार्थी लाडक्या बहिणींच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यांमध्ये जमा करण्याची प्रक्रिया शुक्रवारपासून सुरू करण्यात येत आहे. पुढील २ ते ३ दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होईल आणि सर्व पात्र लाभार्थीना निधी थेट त्यांच्या खात्यात प्राप्त होईल. या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठीचा सरकारचा संकल्प अधिक दृढ केला जात आहे असे आदिती तटकरे म्हणाल्या.

**तांत्रिक कारणामुळे हप्ता थकला?**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना साधारणपणे संबंधित महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पैसे दिले जातात. मात्र, यावेळी एप्रिल महिन्याच्या हप्त्याची रक्कम जमा करण्यास उशीर झाला आहे. आता लाडक्या बहिणींना एप्रिल महिन्याचा हफ्ता येत्या २ ते ३ दिवसांत मिळतील. मार्च महिन्यानंतर नवीन आर्थिक वर्ष सुरू होत असल्यामुळे तांत्रिक कारणास्तव एप्रिल महिन्याचा हफ्ता थकला असल्याची माहिती आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू झाल्यामुळे आता हफ्ता थकण्याची शक्यता नसल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे.

-------------

### पशूसंवर्धन खात्याच्या माध्यमातून

मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पशुसंवर्धनचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतल मुकणे, जि.प. चे अतिरिक्त सीईओ वासुदेव सोळंके, प्रादेशिक सह आयुक्त गणेश देशपांडे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यशाळेच्या प्रारंभी ना. पंकजाताई मुंडे यांनी गोधनाचे औक्षण करून पुष्पहार अर्पण करून स्वागत केले. तसेच कार्यक्रमस्थळी पशूपालन आणि शेतीपूरक संकल्पनांची माहिती देणाऱ्या विविध स्टॉल्सना भेट देऊन त्यांची पाहणी करत माहिती जाणून घेतली. याप्रसंगी कार्यशाळेला उपस्थित पशूपालक आणि शेतकऱ्यांना त्यांनी संबोधित केले. यापूर्वी मंत्री व जिल्ह्याची पालक मंत्री असताना जिल्हयात ग्रामविकास, जलसंधारण, महिला बालविकास खात्याच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या, भरपूर निधी आणला. विकासाची अनेक कामे केली. आता पशूसंवर्धन खाते माझ्याकडे आले आहे. हे खाते तसे श्रीमंत खाते आहे, त्यामुळे यातून चांगली कामे करता येतील. या खात्याच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण तरुणांना स्वावलंबी करण्यासाठी ही कार्यशाळा संपूर्ण राज्यात घेत आहोत. तुमचे हाथ मजबूत करण्यासाठी मी काम करणार आहे. तरुणांनी पशूधनाचे प्रकल्प आणि त्याच्याशी निगडित उद्योग उभारले तर त्यावर पन्नास टक्के सबसिडी मिळते. इतर उद्योगांपेक्षा पशूपालनासारखे उद्योग केले तर मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण उद्योगांसाठी एकात्मिक योजना आणून या उद्योगाला शेतीचा दर्जा मिळवून देणार असल्याचेही ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

----------------

# जातनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयाचे पंकजाताई मुंडे यांनी केले स्वागत

**मुंबई । प्रतिनिधी**

**दिनांक ३० । प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात बुधवार ( दि.३० ) रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येते आहे. राज्याच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव ना.पंकजाताई मुंडे यांनी ट्वीट करत स्वागत केले आहे.**

देशातील नागरिकांच्या भावनांना प्राथमिकता देणारे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा एतिहासिक घेतला आहे. या निर्णयाचे मी स्वागत करते. अनेक दशकांपासून ज्या निर्णयासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यापासून अनेक मान्यवर, अनेक संस्था आणि संघटना यांनी प्रयत्न केले ,त्या प्रयत्नांना आजपासून पूर्ण रूप मिळणार असल्याचे म्हणत ना.पंकजाताई मुंडे यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे आभार मानले.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. ०३ मे २०२५



# बीड जिल्ह्याच्या विकासाला शासनाचे प्रधान्य -इंद्रनील नाईक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला शासनाने प्राधान्य दिले आहे. येथील साधन सुविधांचा विकास करून विकसित जिल्हा अशी बीड जिल्ह्याची नवी ओळख घडवून यात नागरिकांनाही योगदान द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी महाराष्ट्र दिनी केले.**

बीड येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा आज श्री नाईक यांच्या हस्ते येथील पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. संयुक्त महाराष्ट्र लढयात प्राणांचे बलिदान देणा-या १०५ हुताम्यांसोबतच पहेलगाम येथे अतिरेकी हल्यात प्राण गेलेल्या नागरिकांना आपल्या भाषणात त्यांनी आरंभी श्रध्दांजली अर्पण केली. राज्यात गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करून उद्योग व्यवसायांची वाढ करण्याचे धोरण स्वीकारल्याने कला, क्रीडा, संस्कृती, साहित्य यासोबतच राज्य उद्योगातही अग्रणी ठरले आहे. याबद्दल श्री नाईक यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे आभार आरंभी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यानंतर येथे विकासाला चालना मिळेल या



दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्र दिन साजरा

पद्धतीने काम सुरू केले आहे. जिल्हा मुख्यालयात मूलभूत सुविधांचा विकास करण्यासोबतच विमानतळ उभारण्याची घोषणा केली आणि या कामाला गती दिली यामुळे आता बीड जिल्हा विकासासाठी सज्ज झाला असल्याचे श्री नाईक यांनी सांगितले. या ठिकाणी रोजगार आणि स्वयंरोजगार यासाठी टाटा टेक्नॉलॉजीच्या सहकार्याने एक अद्यावत असे इन्सुवेशन सेंटर उभारण्यात येणार आहे. यात १९१ कोटींचा खर्च आहे त्यातील १६३ कोटी सदर कंपनी गुंतवणार असून उर्वरित वाटा उद्योग विभागाचा असेल असे सांगून श्री नाईक म्हणाले की, जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या गुंतवणूक परिषदेत ९३० कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत याचा या खात्याचा राज्यमंत्री या नात्याने मला आनंद आहे. आद्यकवी मुकुंदराज यांचा हा जिल्हा आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच प्राप्त झाला आहे यासाठी पुढचं पाऊल म्हणून अंबाजोगाईला पुस्तकाचे गाव, म्हणून शासनाने घोषित केले आहे. यामुळे साहित्य, नाट्य तसेच चित्रपट क्षेत्रात असणारी बीड जिल्ह्याची ओळख उजळून निघणार आहे असे ते म्हणाले. लाडकी बहीण योजना राबवताना महिलांना बस प्रवास सवलत, ज्येष्ठांना बस प्रवास सवलत तसेच महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजनेअंतर्गत राज्यात कोणतीही उत्पन्नाची अट न घालता १२ कोटी जनतेला ५ लाखापर्यंतचे मोफत वैद्यकीय उपचार आदी माध्यमातून शासन विविध योजना राबवत आहे. शेतकऱ्यांना पिक विमा, विज बिल माफी यासह सौर शेतीपंप आदी माध्यमातून सहाय्य करणे सुरू आहे. याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. ध्वजारोहणानंतर पोलीस दलाचे शानदार संचालन झाले. पोलीस, होमगार्ड, अग्निशामक दल यांच्या पथकाने यावेळी मानवंदना दिली त्यानंतर विविध क्षेत्रातील पुरस्कार विजेते आणि जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेते यांचा मंत्रिमहोदयाच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# प्रा.अब्दुल अजीज अन्सारी यांचा सेवागौरव सोहळा

माजलगाव । प्रतिनिधी

म.शि.प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक अब्दुल अजीज अन्सारी यांच्या सेवापुर्ती निमित्ताने सेवागौरव करण्यात आला. यावेळी म.शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, विजयकुमार सोळंके, ऍड.बी .आर. डक,सत्यप्रकाश रुद्रवार ,डॉ सुनील गरड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. अन्सारी यांच्या सेवागौरव निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. के सानप, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ एम.ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, प्रा. महादेव अलझेंडे, प्रा. लतीफ पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी



बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की प्रा. अन्सारी यांची ओळख विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आहे.त्यांनी प्रमाणितपणे सेवा केली अध्यापन व प्रशासकीय कामातील त्यांच्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयाला झाला. त्यांनी महाविद्यालयात काम करत असताना नोकरी न समजता सेवा म्हणून आपले कर्तव्य पार पाडले. यावेळी सेवपूर्ती निमित्त बोलताना प्रा. अन्सारी म्हणाले की, म. शि. प्र.मंडळात शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली हे भाग्य समजतो. ग्रामीण भागातील विद्यार्थी केंद्रबिंदु ठेवून मी माझी सेवा प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी उपप्राचार्य प्रकाश गवते, प्रा. संजय बागुल,प्रा लतीफ पठाण,प्रा.राजेंद्र जाधव, प्रा.जितेंद्र ठोंबरे, प्रा बबन उदावंत, प्रा. विकास शिंगणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रा.अन्सारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# केज नगरपंचायतीच्या वतीने शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू

बीड । प्रतिनिधी

केज शहरातील तहानलेल्या शिक्षक कॉलनी भागात आजपासून टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. केज नगरपंचायतला केज शहरातून सर्वाधिक महसूल देणाऱ्या शिक्षक कॉलनी भागात पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे या भागात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत असते. या वर्षी कडक उन्हाळा पडल्यामुळे या भागातील बोरवेल पूर्णपणे आटले आहेत. पाण्यासाठी वणवण भटकत पाणी मिळवणे किंवा विकत पाणी घेणे येवढेच पर्याय सद्या या भागातील रहिवासी लोकांच्या नशिबी आले होते. परंतु केज नगरपंचायतीच्या वतीने आज पासून शिक्षक कॉलनी भागात टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्यामुळे या भागातील रहिवासी गटनेते हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सिताताई बनसोड , नगरसेवक बाळासाहेब गाडवे, बालाजी जाधव व नगरपंचायत विभागाचे आभार मानत आहे. शिक्षक कॉलनी भागातील पत्रकार प्रकाश मुंडे यांचे चिरंजीव राहुल मुंडे यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले होते .राहुल मुंडे यांच्या स्मरणार्थ या भागात नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या राहुल मुंडे प्रतिष्ठान,



युवा नेते खय्युम शेख , पत्रकार प्रकाश मुंडे, पिटू भैय्या तांदळे, एम डी घुले सर, अरुण बप्पा धस सर ,सुधाकर ढाकणे सर, अमोल धस, सोनू धस, रुद्रा तांदळे, रतन वाघमारे व नागरिक तसेच महिला मंडळ यांनी पाण्याची टाकी व पाइपलाइनने पाणी पुरवठा होत नाही तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा करावा ही मागणी लावून धरली होती ही मागणी मान्य केल्यामुळे गटनेते हारुण भाई इनामदार व नगराध्यक्षा सिताताई बनसोड यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# बाजार समिती कार्यालयात आमदार सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण

माजलगाव । प्रतिनिधी

उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा फुले पिंपळगाव येथे आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे, संचालक तथा सोळंके कारखान्याचे अध्यक्ष वीरेंद्र दादा सोळंके, माजी सभापती संभाजी शेजुळ, जेष्ठ नेते अच्युत लाटे,संचालक दत्तात्रय डाके,संजय कचरे, आबाजी भोसले,भागवत शेजुळ, अमोल जाधव, श्री. नंदकिशोर सजगणे, डॉ. उद्धव नाईकनवरे, भगवान आगे, प्रभाकर होके पाटील, आसाराम घायतिडक, कादिर पठाण यांचे सह सर्व आडते, व्यापारी, मापाडी, हमाल बांधव यांचे सह अधिकारी, कर्मचारी, वृंद उपस्थित होते. यावेळी सभापती जयदत्त नरवडे यांचे समायोजित भाषण झाले.

# उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्‌घाटन

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार येथील जिल्हाधिकारी कार्यालयात उभारण्यात आले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे उद्घाटन आज उद्योग व बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते झाले.



यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच या कक्षाचे प्रमुख चैतन्य कागदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कक्षाचे फीत त कापून उद्घाटन केल्यानंतर श्री नाईक यांनी या कक्षाची पाहणी केली तसेच येथील कामाबाबत माहिती घेतली तसेच अधिक चांगले काम करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर हा कक्ष उभारण्यात आला आहे. ज्या गरजूंना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज लागणार आहे अशांना येथे अर्ज करता येईल. त्यांना मार्गदर्शनासोबतच उपचार सुरू असणाऱ्या रुग्णालयाशी समन्वय आणि आर्थिक मदत या ठिकाणी मिळू शकेल. यापूर्वी मुंबई येथे अर्ज करावा लागत होता मात्र जिल्हा मुख्यालयातच ही सुविधा उपलब्ध झाल्याने गरजू रुग्णांची मोठी सोय होणार आहे.

# श्रीमती मनोरमाबाई कंगळे यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी वसाहत परळी रोड मधील ज्येष्ठ नागरिक मनोरमाबाई चंद्रकांतराव कंगळे यांचे एक मे गुरुवार रोजी पहाटे त्यांच्या राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९० वर्षांच्या होत्या.



त्यांच्या पश्चात त्यांची तीन विवाहित मुले सर्वश्री सेवानिवृत्त अभियंता शिवराज कंगळे ,पोस्ट ऑफिस कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचारी शाम कंगळे , स्थापत्य अभियंता संजय कंगळे तसेच एक विवाहित मुलगी, सुना ,नातवंडे, पतवंड असा परिवार आहे.

गुरुवारी सायंकाळी अंबाजोगाई येथील रविवार पेठ मधील बोरुळ तलावामधील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी त्यांचे नातेवाईक मित्रपरिवार आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# मनस्विनीच्या वतीने कामगार दिनानिमित्त घरकाम करणाऱ्या महिलांचा सन्मान




अंबाजोगाई । प्रतिनिधी

१ मे (गुरुवार) रोजी महाराष्ट्र दिन तथा कामगार दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाई शहरातील मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने रविवार पेठ येथे घरकाम करणाऱ्या महिलांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी घरकाम करणाऱ्या भगिनींचा सत्कार व सन्मान करण्यात आला . या मेळाव्यासाठी प्राध्यापक डॉक्टर रमा पांडे आणि प्राध्यापक डॉक्टर अरुंधती पाटील यांनी उपस्थित राहून उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. उपस्थित महिलांशी संवाद साधताना प्रा. अरुंधती पाटील यांनी विविध कायद्यांची माहिती देताना उपस्थित महिलांना बोलते केले. तसेच डॉक्टर रमा पांडे यांनी स्त्रीमुक्ती परिषदेस पन्नास वर्ष झाल्याच्या निमित्ताने स्त्री चळवळीचा आढावा घेतला. महिला विकासासाठी शासकीय धोरणे, कायदे कसे तयार झाले ए त्याचे स्वरूप कसे आहे याबाबत प्रतिपादन केले. तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगार महिलांची सामाजिक स्थिती, अंधश्रद्धा, मुलींचे शिक्षण यावर भर दिला. याच कार्यक्रमात पल्लवी शेळके , निताबाई सातपुते यांच्यासह अन्य घरकाम करणाऱ्या भगिनींचा सत्कार व सन्मान करण्यात आला. मेळाव्यात जमलेल्या अनेक महिलांनी त्यांना घरात आणि घराबाहेर तसेच काम करतांना येणाऱ्या अडचणी व समस्या मांडल्या . आम्हाला कायद्याची माहिती नसल्याने मालक लोक गैरफायदा घेतात व आर्थिक पिळवणूक करतात हेही उपस्थित महिलांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली केंद्रकर यांनी केले तर आभार गजराताई यांनी मानले. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी श्रीमती अनिता पटाईत यांनी बहुमोल असे सहकार्य केले.

# माझा महाराष्ट्र टॅलेंट सर्च परिक्षेत रणवीर पवार राज्यात पहिला

कळंब । प्रतिनिधी

**नवोदय - शिष्यवृत्ती परिक्षेच्या दृष्टीने शालेय पातळीवर उपयुक्त ठरणाऱ्या माझा महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.**



या परीक्षेत कळंब तालुक्यातील खडकी गावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेचा इ.५ वी वर्गातील विद्यार्थी रणवीर राजेंद्र पवार याने २०० पैकी १९६ गुण मिळवून राज्यात पहिला क्रमांक पटकावला. रणवीर याने यापूर्वी मंथन,एन.एस.एस.ई., आय.एम.विनर, अक्षरगंगा,ज्यु.आय.ए.एस.,अशा अनेक परिक्षेत यश मिळवले असून त्याची १८ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेतून नवोदय विद्यालय प्रवेशासाठी निवड पण झाली आहे. रणवीरला खडकी शाळेतील त्याचे वर्गशिक्षक तथा मुख्याध्यापक आनंद राणे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेतील शिक्षक तात्यासाहेब सुरवसे व सुरेश जोशी तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारूती विटेकर,उपाध्यक्ष सौ कल्पना राखुंडे व सरपंच सौ अस्मिता राखुंडे तसेच उपसरपंच सुखदेव राखुंडे यांनी त्याचे अभिनंदन केले.

पान ६ वरून...

## जिल्ह्यात शिवसंग्राम सदस्य

जवळपास ५० हजार सदस्य बनवणार आहेत. या अभियानात युवा, लाडक्या बहिणी, बौध्द समाजात सर्वच समाजाने सहयोग घेतला आहे. असा कोणताही समाज नाही ज्याने शिवसंग्रामने सदस्यता घेतली नाही. मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाजतील लोकांनी सहभाग घेतला आहे, याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे , रामदास नाईकवाडे, ज्ञानेश्वर कोकाटे, मनोज जाधव ,सुनील शिंदे ,शेख कुतुब भाई, शेख आबेद, संगीता ठोसर, शेषेराव तांबे, सुशील कांबळे, कैलास शेजाळ, विठ्ठलराव ढोकणे, राजेंद्र आमटे , अशोक लोकरे, रायचंद कापसे, देविदास मेंगडे , धर्मराज मागदे, पंडित शेंडगे ,हरीचंद्र ठोसर, गणेश धोंडरे,संदीप नवले, ओकार पाटील, आदी उपस्थित होते.

## विनोद सक्राते हे पद्मश्री

राष्ट्रसेवा पुरस्काराचे वितरण केले जाते. सन २०२५ या वर्षांमध्ये श्री सक्राते विनोद भागवत, यांना सामाजिक कार्याबद्दल दिनांक २७/४ /२०२५ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन सरदार वल्लभभाई पटेल चौक मंगळवार पेठ पुणे या ठिकाणी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल बीड जिल्हावासियांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

पान ६ वरून...

## जिल्ह्यात 'कंपोस्ट खड्डा भरू

कालावधीत गावातून संकलीत केलेला ओला कचरा नाडेप मध्ये कचरा भरण्यात आला असून त्यापासून खत निर्मितीनंतर १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत नाडेप खड्ड्यामध्ये तयार झालेले खत उपसण्याची प्रक्रिया होईल. सदर अभियाना राबविणेबाबत सर्व गट विकास अधिकारी यांनी अभियानाबाबत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे निमंत्रण पत्रिका सर्व ग्रामपंचायतींना पाठवल्या होत्या तर या उपक्रमात सहभागी होण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींना निमंत्रण दिले होते.

अभियानाची पडताळणी :

१३८ दिवसाच्या ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !'' या मोहिमेची पडताळणी जिल्हास्तर , तालुकास्तरील अधिकारी कर्मचारी करणार आहेत, हे सर्व अधिकारी कर्मचारी ओल्या कऱ्यापासून भरलेल्या नाडेप खड्ड्याची पडताळणी करतील.

## वस्त्या अस्तित्वात नसतांना

झाली (२) नोंद करतेवेळी दिलेले ग्रामपंचायत ठराव अहवाल देण्यात यावा (३) प्रत्येक वस्तीमध्ये किती लोकसंख्या आहे याची प्रत देण्यात यावी अशी माहिती विचारली असता सदरील ग्रामपंचायत जनमाहिती अधिकारी यांनी त्या अर्जाचा प्रतिउत्तर देत सदरील धूनकवाड येथे कांगने वस्ती, धनगर वस्ती, अहिल्याबाई होळकर वस्ती कोणत्या वर्षी नोंद झाली याची नोंदीबाबत कोठलेही अभिलेख ग्रामपंचायत धूनकवड येथे उपलब्ध नाही, ठराव उपलब्ध नाही व पंचायत समिती धारूर यांच्या मार्फत तांडा वस्ती सुधार योजनेनुसार कांगने वस्ती १५०, धनगर वस्ती १०० व अहिल्याबाई होळकर वस्ती ७५ अशी लोकसंख्या असल्याचा आराखडा आहे परंतु ह्या दाखवलेल्या वस्त्याच अस्तित्वात नसल्याचा दावा उपोषणकर्ते पाराराम यादव यांनी केला आहे. सदरील ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांनी बोगस बिले उचलून शासनाची फसवणूक केली आहे त्यामुळे सदरील प्रकरणी वारंवार अर्ज दिल्यामुळे तालुकास्तरावर समिती नेमण्यात आली परंतु त्यांनी धातूर मातूर कार्यवाही करून सरपंच व ग्रामसेवक यांना वाचवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोपही पाराराम यादव यांनी केला आहे तरी सदरील ग्रामपंचायत मधील सरपंच ग्रामसेवक यांनी संगनमत करून शासनाची ३० लाख रुपयांचा अपहार केलेला आहे व यासाठी वारंवार अर्ज दिलेला आहे की यावर सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे आणि सदरील प्रकरण हे दडपन्यात येऊ नये यासाठी गुरुवार १ मे रोजी पाराराम यादव हे आमरण उपोषणाला बसले आहेत.वस्त्या अस्तित्वात नसतांना तीस लाखांचा अपहार केल्याचा उपोषणकर्त्याचा आरोप

## मुलींच्या संरक्षणाबाबतची

माणुस म्हणून मला कसे जगता येईल,माझा विकास कसा होईल असा विचार अंगी रूजावा समाजामध्ये स्वतःची ओळख निर्माण होण्यासाठी काही तरी करावे लागते या साठी अशा शिबीराची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले व भारतीय संविधानातील मानवी मुल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा दिली.

मुलींनी स्वतःमधील क्षमता ओळखून या क्षमतांचा पुरेपूर वापर केला पाहीजे शिवाय आयुष्यात सकारात्मक बदल करावा असे आवाहन अध्यक्षीय समारोपात बर्दापूरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक समन्वयक प्रा.डॉ.प्रविण भोसले यांनी केले.संचालन प्रा.सचिन कऱ्हाड यांनी तर उपस्थितांचे आभार शिबीर प्रमुख डॉ.सारिका जगताप यांनी मानले.यावेळी कोषाध्यक्ष डॉ. शैलेश वैद्य, सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे,सल्लागार एन.के.गोळेगांवकर, एम.एस.लोमटे, संचालक आर.व्ही. सोनवळकर,अंगद कऱ्हाड, सय्यद पाशुमियाँ,शिबीर समन्वयक ऍड.कल्याणी विर्धे, आदीसह संस्थेचे इतर संचालक,सर्व विभागातील कर्मचारी,शिबिरातील विद्यार्थिनी,उपस्थित होते.

## चोरी करण्याच्या उद्देशाने

सदर फिर्यादी वरुन आरोपी विरोधात गु.र.न.०५/२०१८ अन्वये मुंबई पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे नोंदवण्यात आला होता, प्रकरणात तपासणी अंमलदार ए एस आय राठोड यांनी आरोपी विरुद्ध आरोपपत्र दाखल केले, त्यानंतर प्रकरणात फिर्यादी, तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांचे जबाब झाल्यानंतर, सरकार पक्षाचा पुरावा ग्राह्य धरुन पहिले प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री बी व्ही बुरांडे यांनी आरोपींना प्रत्येकी सहा महिन्यांचा कठोर कारावास व ५००/रुपये दंड(दंड न भरल्यास १५दिवस कठोर कारावास)शिक्षा ठोठावली होती,सदर शिक्षेच्या नाराजीने आरोपींनी माजलगाव येथील सत्र न्यायालयात फौजदारी अपील क्रमांक १४/२०१९ दाखल केले होते. सदर प्रकरणात आरोपीचे विधिज्ञ ॲड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ, समाधान पांडुरंग पौळ यांची सबळ पुराव्याअभावी माजलगाव येथील दुसरे सत्र न्यायाधीश श्री भास्कर जी धर्माधिकारी साहेब यांनी दि. ३० एप्रिल रोजी निर्दोष मुक्तता केली.

## परळी न्यायालयाची नवीन

व्यवस्था असावी. न्यायालयाच्या परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी असेही त्यांनी यावेळी म्हटले.परळी येथे ४१ कोटी रूपये खर्च करून बाधण्यात येणाऱ्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीच्या कोनशिला समारंभ आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, बार कौन्सिल महाराष्ट्राचे सदस्य व्ही डी साळुंके, परळीचे दिवाणी न्यायाधीश दिपक बोर्डे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड हरिभाऊ गुट्टे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

ना.पंकजाताई मुंडे यावेळी पुढे बोलताना म्हणाल्या, परळी न्यायालयाला नवीन इमारत मिळाली याचा मनस्वी आनंद होतो आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या प्रयत्नाने परळी तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर परळीत न्यायालय सुरू झाले. पुढे २००९ साली मी परळीची आमदार असताना कोर्टाची इमारत इरिगेशन विभागाच्या रेस्ट हाऊसच्या जागेत आणली. तेंव्हापासून सातत्याने आम्ही विकासाच्या प्रश्नांवर काम करत आहोत. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया थांबवणार नसल्याचे त्या म्हणाल्या. राज्य सरकारचा घटक म्हणुन स्वतः पुढाकार घेऊन लोकहिताच्या कामासाठी जे काही करता येईल त्यासाठी पूर्णपणे सहकार्य करणार असल्याचा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

**फेक अकाउंटवर कडक कायदा व्हावा**

सोशल मीडियात होत असलेल्या वाढत्या गैरप्रकाराबद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी चिंता व्यक्त केली. सोशल मीडियावर फेक अकाऊंटच्या माध्यमातून खोटी माहिती व बनावट ट्रोलिंगचे वाईट प्रकार सुरू आहेत. अशा प्रवृत्ती समाजात वाढत आहेत, यावर कुठेतरी आळा बसला पाहिजे. सोशल मीडियाच्या या गैरवापराविरोधात कडक कायदा करण्याची आवश्यकता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# हवामान बदलामुळे दूध उत्पादकांचे उत्पन्न घटणार

## पंजाब कृषी विद्यापीठाच्या संशोधन अहवालात इशारा

मुंबई : हवामान बदलामुळं पशू चाऱ्याच्या खर्चात वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे लहान दूध उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न १५-२५ टक्क्यांपर्यंत घटू शकतं, असा इशारा पंजाब कृषी विद्यापीठाच्या संशोधन अहवालात देण्यात आला आहे. त्यामुळे हवामान बदलाचं संकट अधिक गंभीर होऊ लागल्याचं दिसत आहे.



हवामान बदलामुळे दुग्धव्यवसायाला झळ बसू लागली आहे. चारा पिकांची टंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे पशुखाद्याच्या टंचाई चिंता वाढवणारी ठरत आहे. परिणामी दूध उत्पादकता धोक्यात येईल, असं या अहवालात सांगण्यात आलं आहे. या संशोधन अहवालानुसार, कोरडवाहू शेतीचं क्षेत्र अधिक असलेल्या महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात राज्यात चाऱ्यांची उपलब्धता डोकेदुखी ठरू शकते. कारण मॉन्सूनचा पॅटर्न बदलत आहे. त्याचा परिणाम चाराऊ जमिनीच्या क्षेत्रावर होऊ लागला आहे. तसेच वाढत्या तापमानामुळे चाऱ्याची गुणवता कमी होऊ लागली आहे. त्याचा परिणाम दुभत्या जनावरांच्या आरोग्यावर होत असल्याचा धोका वर्तवण्यात आला आहे. चारा टंचाईमुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांना महागड्या पशुखाद्यावर अवलंबून राहावं लागू शकतं. दुधाला मात्र किफायतशीर दर मिळत नाही, त्यामुळे छोटे दूध उत्पादक शेतकरी या व्यवसायातून बाहेर पडत असल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. ग्रामीण भागात शेतीला पूरक म्हणून दुग्धव्यवसाय केला जातो. त्यातून ग्रामीण भागातील नागरिकांचं पोषणही होतं. परंतु दूध व्यवसायात उत्पन्नाची हमी मिळत नसल्याने या व्यवसायाकडे शेतकरी पाठ फिरवत आहेत. पुढील काळात त्यातून अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा गंभीर इशाराही संशोधन अहवालात दिला आहे. तापमान वाढीचा दुभत्या जनावरांवर परिणाम होतो. जनावरांना उष्णतेचा ताण सहन करता येत नाही. त्यामुळे तापमान ३० सेल्सियसपेक्षा अधिक होतं, त्यावेळी दुभत्या गाय आणि म्हशींच्या शरीराचं तापमान देखील वाढतं. त्यामुळे जनावरांच्या आहारात घट होते. परिणामी जनावरांची दूध उत्पादकता आणि पुनरुत्पादन क्षमता कमी होते. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थानसारख्या राज्यात अति उष्णतेमुळे दूध उत्पादनात १० ते ३० टक्क्यांपर्यंत घटीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

### वाढत्या उष्णतेचा परिणाम

देशात वाढत्या उष्णतेमुळे चाराऊ जागा कमी झाल्या आहेत. दुसरीकडे पशुखाद्यासाठी लागणाऱ्या मालाच्या किंमतीत वाढ झाली आहे. परिणामी पशूखाद्य किंमतीत वाढल्या आहेत. त्यातून दूध उत्पादकांचा खर्च वाढून नफा कमी झाल्याचं निरीक्षण या संशोधन अहवालात नोंदवण्यात आलं आहे.

### जनावरांच्या आरोग्याला धोका

हवामान बदलाचा फटका शेती क्षेत्राला सर्वाधिक बसत आहे. त्यामुळे शेती संलग्न व्यवसायावर त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. तापमान वाढीमुळे जनावरांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. जनावरांची पचनसंस्था कमकवुत होते. त्यामुळे स्तनदाह, श्वसन संक्रमण, खूरकुज आदि रोगाचा प्रादुर्भाव बळवतो, असंही या संशोधन अहवालात दावा करण्यात आला आहे.

# जाणून घ्या मातीपरिक्षण करण्यासाठी नेमकी वेळ कोणती

अनेक शेतकरी माती परिक्षण करतात. पण काही शेतकरी माती परिक्षण वेळवर करत नाहीत तर काही शेतकऱ्यांना आपण मातीपरिक्षण नेमक कोणत्या उद्देशानं करतोय हेच माहीत नसत. त्यामुळे माती परिक्षणाचा म्हणावा तसा फायदा होत नाही.

माती परीक्षण करण्यामागचा उद्देश : माती परीक्षण आपण नेमक्या कोणत्या उद्देशाने करणार आहोत, हे माहिती असले पाहिजे. कारण उद्देशानूसार माती परिक्षणाचा नमुना घेण्याची पद्धत ही वेगवगळी असते. त्यानुसार शेतातून मातीचा नमुना घेण्याची पद्धत ठरवावी लागते. शेतामधील माती साधारणतः तीन उद्देशांसाठी तपासली जाते. यामध्ये पहिला उद्देश म्हणजे विविध हंगामी पिके म्हणजे तुम्ही जर अन्नधान्य पिके, भाजीपाला किंवा फुल पिके जर घेणार असाल तर या पिकाच्या खत नियोजनाच्या दृष्टीने माती परिक्षण कराव लागते. तुम्ही जर बहूवर्षीक म्हणजे लिंबू, आंबा, डाळिंब, पेरू, सीताफळ आणि चिकू यासारखी फळपिके घेणार असाल तर या फळपिकांच्या खत नियोजनासाठी माती परिक्षण करावं लागत. हा झाला दुसरा उद्देश. आणि मातीपरिक्षणाचा तिसरा उद्देश म्हणजे तुम्ही जर नविन फळबागेची लागवड करणार असाल तर त्यासाठी आपली जमीन योग्य आहे किंवा नाही हे तपासण्याची गरज असते. या उद्देशानूसार मातीपरिक्षणाचा नमुना घेऊन मातीपरिक्षण केले तर त्याचा नक्कीच फायदा होतो.

मातीचा नमुना घेण्याची वेळ : मातीचा नमुना शक्यतो खरीप किंवा रब्बी पिकाच्या काढणीनंतर जमीन नांगरणी करण्याआधी आणि कोरडी असताना घ्यावा. कारण माती परीक्षण अहवाल पुढील हंगामातील पेरणीपूर्वी उपलब्ध होणे गरजेचे आहे. म्हणजे त्यानुसार खतांचा नियोजन करणे सोपे जाते. प्रयोगशाळेत नमुना दिल्यानंतर साधारणपणे अहवाल मिळण्यासाठी एक महिन्याचा वेळ लागू शकतो.ते गृहीत धरून मातीचा नमुना प्रयोगशाळेत परीक्षणासाठी पाठवावा. माती परिक्षणाच्या प्रयोगशाळा जवळचे कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र याठिकाणी असतात. या ठिकाणी माफक शुल्कामध्ये माती परिक्षण करून अहवाल मिळतो. काही शहरामध्ये खासगी प्रयोगशाळेतही मातीपरीक्षण करुन मिळते. माती परिक्षणाचा अहवाल मिळाल्यानंतर तो त्या ठिकाणच्या शास्त्रज्ञांकडून समजून घ्यावा. विशेष करुन आपण कोणती पिके घेणार आहोत त्यानूसार खत नियोजनाची माहिती घेण्याचा प्रयत्न करावा. माती परीक्षण अहवालाची वैधता ही साधारणपने दोन ते तीन वर्षांपर्यंत असते. त्यानंतर पुन्हा माती परिक्षण कराव.

यामध्ये पाण्याची सोय असलेल्या शेतात वर्षातून दोन किंवा जास्त हंगामात पिके घेत असाल तर अशा शेताचे माती परीक्षण दर दोन वर्षांनी कराव. आणि जर तुम्ही वर्षातून फक्त एकाच हंगामात पीक घेत असाल तर अशा शेताचे दर तीन वर्षांनी माती परीक्षण करावे. अशा प्रकारे योग्य वेळी मातीपरिक्षण करुन मातीपरिक्षणाचा अहवाल समजून घेऊन खत नियोजन केल तर मातीपरिक्षणाचा नक्कीच फायदा होतो.



# तूर पिकाचे सुधारित वाण आणि वैशिष्टे



तूर हे खरीप हंगामातील अत्यंत महत्वाचे पीक. राज्यात सर्वसाधारपणे १२ ते १३ लाख हेक्टर क्षेत्रावर अति लवकर, मध्यम लवकर आणि मध्यम ते उशिरा कालावधीच्या वाणांची निर्मिती राज्यातील कृषि विद्यापीठांनी केली आहे. तुरीच्या अधिक उत्पादनासाठी पाऊसमान आणि जमिनीचा प्रकार लक्षात घेऊन योग्य वाणांची पेरणी करणे फायदेशीर ठरते.

तुरीच्या वाणाची निवड करताना जमिनीच्या प्रकारानुसार करणे गरजेचे असते. कारण भारी जमिनीत अधिक उत्पादन देणारे तुरीचे वाण हे मध्यम ते हलक्या जमिनीत तितकेच उत्पादन देतील असे नाही. मध्यम प्रकारच्या जमिनीकरिता कमी कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची निवड करावी. लट भारी जमीन असेल तर मध्यम ते उशिरा कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणाची निवड करावी.

बी डी एन ७११ : मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात कोरडवाहू लागवडीसाठी,हलक्या व मध्यम जमिनीत पेरता येणारा १५० ते १५५ दिवसात तयार होणारा ,एकाच वेळी पक्व होणारा,यांत्रिक पद्धतीने काढता येणारा शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरलेला वाण.

पांढऱ्या दाण्याचे वाण : बी डी एन ७११ ,गोदावरी ,बी एस एम आर ८५३. लाल/तांबड्या /तपकिरी/फिकट तपकिरी दाण्याचे वाण :फुले राजेश्वरी ,फुले तृप्ती ,फुले पल्लवी ,बी डी एन ७०८, बी डी एन ७१६, रेणुका, बी एस एम आर ७३६,,आय सी पी एल ८७, आय सी पी एल ८७११९, पी.के.व्ही तारा, पी.डी. के.व्ही .आश्लेषा,ए के.टी ८८११.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी विकसित वाण : फुले पल्लवी, फुले तृप्ती, फुले राजेश्वरी, पी.के .व्ही.तारा, पी.डी. के.व्ही.आश्लेषा, ए के टी ८८११.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे वाण : बी डी एन पी एच-१८-५, बी डी. एन ७०८ (अमोल), बी.डी. एन ७११, बी.डी. एन ७१६, गोदावरी (बी.डी.एन. २०१३ - ४१), रेणुका, बी.एस एम आर. ७३६, बी.एस एम आर ८५३,

इक्रीसॅट,हैद्राबाद विकसित वाण : आय सी पी एल ८७ (प्रगती), आय सी पी एल ८७११९ (आशा),

# खरीप हंगामासाठी वेगवेगळ्या पिकांचे असे करा व्यवस्थापन!

खरीप लागवडीच्या कामाला शेतकरी लागले आहेत. अशावेळी वेगवेगळ्या पिकांचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने सल्ला दिलेला आहे.

पीक व्यवस्थापन सल्ला :

शेतकऱ्यांनी सोयाबीन बियाणे पेरणीपूर्वी त्यांची उगवण क्षमता तपासून घ्यावी. उगवण क्षमता ७० % पेक्षा जास्त असेल तरच बियाणे पेरणीसाठी वापरावे. कापूस पिकाच्या लागवडीसाठी वाण निवडताना जमीन व हवामान, कोरडवाहू किंवा बागायती, लागवडीचा प्रकार व वाणांचे गुणधर्म यांचा विचार करून वाणांची निवड करावी. तूर पिकाच्या पेरणीसाठी बीडीएन-२०१३-४१ (गोदावरी), बीडीएन-७११, बीएसएमआर-७३६, बीएसएमआर-८५३ (वैशाली), बीडीएन-७१६, बीडीएन-२, बीडीएन-७०८ (अमोल), एकेटी ८८११, पीकेव्ही तारा किंवा आयसीपीएल ८७११९ इत्यादी वाणांचा वापर करावा. मूग पेरणीसाठी कोपरगाव, बीएम-४, बीपीएमआर-१४५, बीएम-२००२-१, बीएम-२००३-२, फुले मूग २, पी.के.व्ही.ए.के.एम ४ इत्यादी वाणांचा वापर करावा. उडीद लागवडीसाठी बीडीयू-१, टीएयू-१, टीपीयू-४ इत्यादी वाणांचा वापर करावा. भुईमुग पिकाच्या लागवडीसाठी एसबी-११, जेएल-२४, एलजीएन-२ (मांजरा), टीएजी-२४, टीजी-२६,



टीएलजी-४५, एलजीएन-१, एलजीएन-१२३ इत्यादी वाणांचा वापर करावा. मका पिकाच्या पेरणीसाठी नवज्योत, मांजरा, डीएमएच-१०७, केएच-९४५१, एमएचएच, प्रभात, करवीर, जेके-२४९२, महाराजा, युवराज इत्यादी वाणांचा वापर करावा.

फळबागेचे व्यवस्थापन : नवीन केळी बाग लागवडीसाठी ग्रँड नाईन, अर्धापूरी, बसराई (देशावर), श्रीमंती, फुले प्राईड इत्यादी जातींचा वापर करावा. पूर्वी लागवड केलेल्या बागेत आंतर मशागतीची कामे पूर्ण करून घ्यावी. लागवडीसाठी शासकिय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज लक्षात घेता, नवीन लागवड केलेल्या व लहान केळी, आंबा व सिताफळ झाडांना काठीने आधार द्यावा. नवीन आंबा बाग लागवडीसाठी केसर, पायरी, तोतापूरी, नीलम, सिंधू, साई-सुगंध, वनराज, लंगडा, रत्ना, परभणी भूषण, निरंजन मल्लिका, दशेहरी इत्यादी जातींचा वापर करावा. लागवडीसाठी शासकिय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. वेळेवर एप्रिल छाटणी केलेल्या द्राक्ष बागेत आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. द्राक्ष बागेत अतिरिक्त फुटव्यांची विरळणी करावी. नवीन सिताफळ बाग लागवडीसाठी बालानगर, टिपी-७, धारूर-६, अर्का सहान इत्यादी जातींचा वापर करावा. लागवडीसाठी शासकिय नोंदणीकृत रोपवाटीकेतूनच रोपांची खरेदी करावी. भाजीपाला पीक व्यवस्थापन : तुरळक ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करावी. नवीन लागवड केलेल्या व लहान वेल वर्गीय झाडांना काठीने आधार द्यावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचयित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष १९६४: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकर्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉंटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'मॉंटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक.
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य.
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

## थोडक्यात



### पोलीस उपनिरीक्षक रवींद्र किसनराव नागरगोजे सेवानिवृत

बीड। प्रतिनिधी

येथील पोलिस ठाण्यात सलग३८ वर्षे सेवा करणारे रविंद्र नागरगोजे याचा सेवा निवृत्तीनिमित पोलिस अधिक्षक नवनीत कावत साहेब यांनी त्याचा सपत्नीक सत्कार करून शुभेच्छा दिल्या. नागरगोजे यांनी दिनांक १६/०२ /१९८७ रोजी पोलीस खात्यात जॉईन झाले आणि पोलीस ठाणे नेकनूर, दूरक्षेत्र लिंबागणेश, पाटोदा ,शिरूर, बीड शहर, तलवाडा, वडवणी या ठिकाणी यशस्वीरीत्या पोलीस खात्याची सेवा केली आणि खात्याअंतर्गत परीक्षा देऊन दिनांक २०/१०/२०२० रोजी पोलीस उपनिरीक्षक म्हणून प्रमोशन झाले त्यानंतर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून बीड सेशन कोर्टात तसेच महामार्ग पोलीस केंद्र परभणी येथे सेवा केली . पुढे त्याची दिनांक १८.१.२०२३ रोजी महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे नेमणूक झाली . महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे यशस्वीरित्या व निष्कलंक सेवा एकुण ३८ वर्ष २ महिने पोलीस खात्यात सेवा करून दिनांक ३० )०४ /२० २५ रोजी नियत वयोमानानुसार बीड पोलीस दलातून सेवानिवृत्त झालो आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय बीड येथे माझा सपत्नीक सत्कार मा. पोलीस अधीक्षक साहेब नवनीत कावत साहेब यांचे हस्ते करण्यात आला .यावेळी सत्कार समारंभाला अप्पर पोलीस अधीक्षक मा.सचिन पांडकर मा. गोलडे साहेब तसेच पोलीस निरीक्षक संतोष साबळे साहेब पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ साहेब हजर होते.

### खर्च बाबतीत बीड जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या स्थानी विभागात प्रथमस्थानी

बीड। प्रतिनिधी

बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात ३५ शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रकल्प मंजूर असून २३ शेतकरी उत्पादक कंपनींना १९.९४ कोटी अनुदान वितरीत झालेले आहे. जिल्ह्याचा खर्च २५.८ कोटी झाला असून बीड जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या स्थानी व विभागात खर्च बाबतीत प्रथमस्थानी असल्याचे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान सन २०२४-२५ मध्ये ऊस योजनेत मंजूर कार्यक्रम ७.५० लाख आहे. त्यापैकी प्राप्त निधी ७.५० लाख इतके असून त्यापैकी ४.२१ लाख निधी खर्चीत असून केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विकास योजनेच्या विकास योजनेच्या माध्यमांतून बीड जिल्ह्यामध्ये ८०० हे क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणले जात असून यामध्ये स्कोप प्रमाणपत्र मिळविण्यात बीड जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती विषयांतर्गत सन २०२३-२४ ते २०२६-२७ या कालावधीत बीड जिल्ह्यामध्ये एकूण २१ हजार क्षेत्र नैसर्गिक शेतीमध्ये येणार असून त्यामुळे गुणवत्तापूर्ण उत्पादन घेतले जाणार आहे.रासायनिक शेतीच्या तुलनेत उत्पादन खर्चात बचत होणार आहे.


### रविशंकरच्या संस्थाचालकांनी दिली बेंगलोर आश्रमाला भेट

बीड । प्रतिनिधी

दिनांक २६ एप्रिल २०२५ आर्ट ऑफ लिव्हींग आश्रम बेंगलोर व श्री श्री रविशंकर विद्या मंदिर बीड व ट्रस्ट शाळेच्या कामानिमित्त श्री श्री रविशंकर विद्या मंदिरचे अध्यक्ष पारगावकर व सचिव शेख पाशा या दोघांनी बेंगलोर आश्रम मध्ये जाऊन श्री श्री रविशंकर गुरुजी यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि या भेटीच्या दरम्यान त्यांनी शाळेची प्रगती, शाळेचे उज्वल भविष्य ,मुलांवरचे संस्कार इत्यादीवर चर्चा करण्यात आली. श्री श्री रविशंकर गुरुजी यांनी शाळेच्या वर्षभरातील ऍक्टिव्हिटीज मुलांचे क्रीडा कौशल्य अभ्यासक्रमातील व्हिडिओज फोटो पाहिले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी गुरुजींनी पुढील शैक्षणिक वर्षात बीडच्या शाळेला भेट देण्याचे आश्वासन दिले. अध्यक्ष आणि सचिव यांचे जेव्हा बीडमध्ये आगमन झाले आणि ते शाळेत आले तेव्हा शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी आणि शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच कर्मचारी वृंद यांनी सरांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या भेटीचे मनोगत सांगताना सरांनी सांगितलं की बेंगलोर आश्रम येथे त्यांचे कशाप्रकारे आपुलकीने स्वागत करण्यात आले त्याचप्रमाणे राहण्याची सोय ही अतिशय उत्तम होती, गुरुजींसोबत झालेला सत्संग व गुरुजींच्या सानिध्यात केलेली सुदर्शन क्रिया ही अविस्मरणीय होती.

### संभाजीनगर परिक्षेत्रातून चौसाळा शाळा द्वितीय

बीड : दि.१ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस ग्राउंड बालेपीर येथे राष्ट्रीय उपक्रमांतर्गत १० शाळांचे मुल्यमापन करण्यात आले होते यामध्ये एकूण १० जिल्हा परिषद शाळांनी सहभाग नोंदविला त्यामध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा ही शाळा स्टुडंट पोलीस कॅडेट कार्यक्रम अंतर्गत उपक्रमात संभाजीनगर परिक्षेत्रातून द्वितीय आली आहे. याबद्दल शाळेला द्वितीय क्रमाकांचे पारितोषिक क्रिडा शिक्षक अनंत वाघमारे यांचे सहकारी क्रीडा शिक्षक वायभट सर हे उपस्थित होते. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देवून राज्यमंत्री इंद्रनिल नाईक (बांधकाम व जलसंधारण) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम अतिकिक्त पोलीस अधिक्षक सचिन यांच्या बहुमुल्य मार्गदर्शनाखाली व शहर वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या अधिपत्याखाली नोडल ऑफीसर पोलीस उपनिरीक्षक विजय, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उस्मान, पोलीस हवालदार श्रीकांत, शिवदास यांनी परिश्रम घेवून १० जिल्हा परिषद शाळांमध्ये सायबर सुरक्षा व वाहतुकीचे नियम तसेच पोलीस स्टेशनच्या कार्यालयीन कामकाजाची व शस्त्राची माहिती देवून मार्गदर्शन केले व तसेच शारिरीक बाह्यवर्ग प्रशिक्षण दिले.



# बीड जिल्ह्यात वनविभागात आगीच्या घटनात वाढ

## आगीच्या घटना रोखण्यात वनविभागाला अपयश





बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात यंदा कडाक्याचा उन्हाळा जाणवत असुन दिवसाचे तापमान ४३ अंतापर्यंत पोहोचले आहे. तापमानात वाढ झाल्याने जमिन तापु लागली आहे.वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा नष्ट होऊन गवत वाळले आहे.झाडांची पाने सुकुन खाली पडली आहेत त्यामुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे.

त्यामुळे वनविभागात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी मानवी चुकांमुळे पावसाळ्याच्या दिवसांत गवत व चारा चांगला येण्यासाठी नागरीकांकडुन गुपचूप हा पालापाचोळा पेटवून दिला जातो.ही आग पुढे जाऊन वनपरिक्षेत्रात पोहोचल्याने तेथील वनसंपत्ती, वन्यप्राण्यांना याची झळ बसते.यातुन वणवा पेटुन वनविभागाचे मोठे नुकसान होते.वनविभाग आगीच्या घटनांना नियंत्रणात आणण्यासाठी शिताफीचे प्रयत्न करताना दिसत आहे.आग लागण्याची शक्यता टाळण्यासाठी वनविभागाची जागृती मोहीम, नागरीकांना सावध करणे,आग प्रतिबंधक उपाययोजना तोकड्या पडत असल्याचे दिसून येत आहे. या वणव्यात शेकडो झाडे जळून खाक होत आहेत.शेकडो पक्षी, सरपटणारे प्राणी मृत्युमुखी पडत आहेत.वनविभागाने या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देऊन डोंगराला लागणारे वनवे रोखावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. बीड तालुक्यातील बीड वनपरीक्षेत्रातील नागझरी डोंगराला काल दि.०१ गुरूवार रोजी दुपारी १ वाजता आग लागली. ऐन कडक उन्हाळ्यात आग डोंगराला आग लागल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. डोंगराला लागलेली आग विझवण्यासाठी वनविभागातील हनुमंत वायभट, दशरथ गुजर, विलास नवले, शंकर शिंदे, मधुकर नैराळे, बबन पाव्हणे ,गौतम वीर, चंद्रकांत बडगे ,महेश मेटे ,शेख अकबर, परमेश्वर पाव्हणे,परमेश्वर नाईक, शहादेव चव्हाण, बळीराम चव्हाण ,संदीप पवार ,मधुकर वायभट, लक्ष्मण जाधव आदी १५ पेक्षा जास्त वनविभागाचे कर्मचारी यांनी आटोकाट प्रयत्न करूनही आग आटोक्यात येण्यास ६ घंटे लागले. या आगीत शेकडो एक्करवरील झाडे, झुडपे जळून खाक झाली.

डोंगररांगांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याने ही आग वनक्षेत्रात येऊ नये यासाठी वनविभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. वनक्षेत्रात आग पसरू नये यासाठी फायर लाईन्स टाकले आहेत.

गवत कापण्याचे काम केले जात आहे. तसेच आग आटोक्यात आणण्यासाठी कर्मचाऱ्यांना ब्लोअर मशीन दिलेल्या आहेत. या मशीनच्या सहाय्याने आग कशी नियंत्रणात आणावी यांचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याचे वनविभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन सांगण्यात येते .मात्र तरीही बीड जिल्ह्यातील आगीच्या घटनात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असुन वनविभागाचे प्रयत्न तोकडे पडल्याचे दिसून येत असल्याचे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

### इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजी नगर, जालना, बीड आणि लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची सांक्षांकित प्रत असावी, विद्यार्थी दारिद्र रेषेखालील असेल तर त्यासंबंधी छायांकित प्रत व दारिद्र रेषा अनुक्रमांक नमूद करावा. पालकांची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असून यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा, वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निम शासकीय नोकरदार नसावेत, प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामूल्य उपलब्ध असून दिनांक २३ मे २०२५ पर्यंत परिपूर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे.तरी या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपूर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार असून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याबाबतचे आवाहन प्रकल्पाधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

### मानवी जीवाचे मोक्ष मिळविणे हे परम कर्तव्य आहे-रंधवे बापू

बीड। प्रतिनिधी

मृत्यूलोकात माणसे पैसा प्राप्त करून घेतात हे सामान्य कर्तव्य आहे. पुण्याची प्राप्ती करून घेतात हे विशेषकर्तव्य आहे. पण सर्व दुःखाचा नाश व सुखाची प्राप्ती करून घेणे हे परम कर्तव्य आहे यासच मोक्ष म्हणतात व हे मिळविणे हे जीवाचे परम कर्तव्य आहे म्हणजेच मानवी जीवाने मोक्ष मिळवणे हे परम कर्तव्य आहे असे प्रतिपादन वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे बापू पाटोदा यांनी संत वामन भाऊ भगवान बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ नगर येथे कालापूर्व किर्तन प्रसंगी केले. बीड येथील श्री संत वामन भाऊ महाराज व श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे वामन भाऊ महाराज, भगवान बाबा महाराज, संत तुकाराम महाराज, विठ्ठल रुक्मिणी व हनुमंत देवता यांच्या तेराव्या प्राणप्रतिष्ठापना निमित्ताने संत वामनभाऊ महाराज व भगवान बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री हरिभक्ति परायण राजेंद्र सानप व बंधू यांच्या आयोजनातून सुरू असलेल्या अखंड त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहात द्वितीय कीर्तन पुष्पगुंफताना काय सांगू आता संतांचे उपकार/ मज निरंतर जागविती // १ // या संत तुकाराम महाराजांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्ति परायण रामकृष्ण रंधवे



बापू पाटोदा हे संत जीवनाच्या कार्याचा आढावा सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्ति परायण रामकृष्ण रंधवे बापू म्हणाले की, मृत्युलोकात जनावरेही जगतात. जगणं महत्त्वाचे नसून जाग होणे महत्त्वाचे आहे .जाग हे संत महात्मे करतात. धनाने परिस्थिती सुधारते पण संत हे विचार देऊन मनस्थिती सुधारतात. अन्न हे एक वेळचे दुःख नाहीसे करते पण संत विचार हे जन्मोजन्मीचे दुःख निवारण करते. संत विचार हे आत्मबोधावर आरुढ करतात. म्हणजेच अनंत जन्मीच्या दुःखाची निवृत्ती ही संतांच्या विचारानेच होते. मनुष्य जोपर्यंत जागा होत नाही तोपर्यंत जन्म मरणाच्या फेऱ्यातून बाहेर पडत नाही .म्हणूनच संतांनी आपले विचार देऊन मानवी जीवनावर उपकार केले आहेत. अविद्या निद्रेतून संत स्वस्वरूपाची जागृती देतात. त्यांचे हे उपकार फार मोठे असून त्यातून उतराई होता येत नाही. ते जरी सहज बोलले तरी जीवाचे त्यात कल्याणच होते. माऊलीने सतत त्रास देणाऱ्या विसोबा खेचरास ब्रह्मरूप करून नामदेवराय यांचे गुरु केले. मानवी जीवनाचे कल्याण करण्याकरताच संत हे वैकुंठातून येथे आले आहेत. ते सतत स्वतः जागतात व दुसऱ्यास जागवितात. जीवाचा उद्धार करण्याकरिता ते सतत प्रयत्न करतात. संत हे आपणास जागविती, शिकविती,व सांभाळीती म्हणजे परम कल्याण असा मोक्ष मिळवून देतात. असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी हरिभक्ति परायण मोहन महाराज खरमाटे, भीमाशंकर महाराज श्री रामहरी रसाळ गुरुजी, अनंत घीगे साहेब, प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री राजेंद्र सानप, नागरगोजे गुरुजी, सुमित्रा ताई खेडकर, धनंजय सानप, गायक म्हणून हभप बाबासाहेब महाराज शिंदे वैद्यकीन्ही, ह भ प अंगद महाराज मोरे, वैजनाथ सानप गुरुजी, दिगंबर कुंडलकर महाराज, अरुण बावणे महाराज, किसन माने महाराज, श्रीहर्ष महाराज धांडे, वैभव महाराज येडे तर मृदंगमणी म्हणून अक्षय महाराज घोलप व वैभव ढाकणे तर असंख्य भावी भक्त उपस्थित होते.

### स्वामी समर्थ मठाच्या सार्ध शतकपुर्तीनिमित्त विविध कार्यक्रम

केज । प्रतिनिधी

श्री स्वामी समर्थ मठ केज येथील श्री.स्वामी समर्थांच्या पादुका स्थापनेला दिडशे वर्ष (शतकोत्तर सुवर्ण महोत्सव) पुर्ण होत आहेत.त्या निमीत्त विश्वशांती व विश्व कल्याणासाठी पंचायतन यज्ञाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

दि.५ मे ते १२ मे या कालावधीत श्री स्वामी समर्थ मठामध्ये पंचायतन यज्ञ होणार आहे. यामध्ये पाच यज्ञ कुंड असणार आहेत. श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंचदशाक्षरी नाम जपा चा दिनांक १४ डिसेंबर २०२४ (दत्त जयंती) या शुभ दिवसापासुन दिड कोटी जपाचा संकल्प करुन सुरुवात करण्यात आलेली होती. या नाम जपामध्ये केज शहर व परिसरातील सर्व स्वामी भक्त, सर्व समाजातील महिला पुरुष, युवक, युवती सहभागी झाले होते. त्यास महिला वर्गा तुन उस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे.या पंचायतन यज्ञामध्ये श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या पंधरा लाख नाम जपाचा स्वाहाकार होणार आहे. प्रधान आचार्य श्री.श्रीराम रघुनाथबुवा जोशी यांच्या अधिपत्याखाली व वेदशास्त्र




संपन्न ब्रम्ह वृंदाच्या मार्गदर्शना खाली सर्व धार्मिकविधी संपन्न होणार आहेत. यात दररोज सकाळी ५.३० वाजता काकडा आरती, सकाळी ६.०० ते ७.०० श्री स्वामी समर्थांना लघु रुद्राभिषेक,७.३० ते १२.०० यज्ञ स्वाहाकार, १२.३० नैवेद्य व महाआरती, तसेच दुपारी ४.०० ते ६.०० ह.भ.प. श्री.भालचंद्र देवा यांच्या मधुर वाणीतुन श्री स्वामी समर्थ कथामृत, तसेच सायंकाळी ७.०० ते ८.०० महाआरती व उपासना, सायंकाळी ८.३० ते ११.३० विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये पंडित शौनक अभिषेकी, पंडित जयंत केजकर, इंडियन आयडॉल धनश्री देशपांडे व राजश्री लेले, तसेच स्वरसरित सरिता परांडेकर यांचे भक्ति संगित-नाटय संगित, किर्तनाचार्य ह.भ.प.डॉ.श्री.चारुदत्त आफळे, व ह.भ.प.किर्तन सम्राट समाधान महाराज शर्मा यांचे किर्तन व अभिजित धर्माधिकारी यांचे अंर्तमुख होणारे प्रवचन, मगरमिठी भजनी मंडळ कोल्हापुर यांचे भजन होणार आहे. दि. १२ मे रोजी यज्ञाची पुर्णाहुती व दुपारी १.०० ते ५.०० महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ सर्व स्वामी भक्त व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ मठ संस्था व पं. पु.श्रीमंत नानासाहेब महाराज देशपांडे प्रतिष्ठाण केज व समस्त केजकर देशपांडे व स्वामी समर्थ भक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मानवत येथील इयत्ता दहावी बॅच २००२ तर्फे शाळेस मदतीचा हात

मानवत । प्रतिनिधी

असं म्हणतात आई-वडिलांच्या आणि शाळेच्या ऋणातून कधीच मुक्त होता येत नाही कारण जीवन जगण्याच्या शर्यतीत अनेक चढ-उतार पार करण्याचे सामर्थ्य आई वडील देतात आणि शिक्षणाच्या बळावर आकाशाला गवसणी घालण्याचे कौशल्य शाळा देत असते.

शाळेचे उपकार फेडणे शक्य जरी नसले तरीही एक छोटासा प्रयत्न म्हणून मानवत येथील नेताजी सुभाष माध्यमिक विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २००२ मध्ये दहावी उत्तीर्ण करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी शाळेतील विज्ञान प्रयोगशाळा नूतनीकरणासाठी मदतीचा हात पुढे करून आदर्श ठेवला आहे. १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत सर्व वर्गमित्रांनी एकत्र येऊन मानवीय अवयवांची प्रतिकृती,कृत्रिम मानवीय सापळा,प्रयोगास लागणारी विविध रसायने,मायक्रोस्कोप,जगाचा नकाशा आणि इतर वस्तू असे ७०,०००/- किमतीचे



प्रयोगशाळा साहित्य शाळेस सुपूर्द केले याप्रसंगी शाळेतील शिक्षक वर्ग आणि ने.सु.वि. २००२ बॅचचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.‘‘शाळेला समाजाचा आधार लागतो आणि समाजाला शाळेचा अभिमान असावा ह्या दोन्ही गोष्टी तुमच्या एका कृतीतून साध्य झाल्या‘‘ असे म्हणत विद्यार्थ्यांच्या शाळेबद्दल असणाऱ्या जाणीव आणि प्रेमाबद्दल सर्व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले या छोटेखानी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री.डॉक्टर डोंबरे सर,सूत्र संचालन श्री.होगे सर आणि अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक श्री.संजय लाड सरांनी केले.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जगाचे प्रेरणास्त्रोत: पप्पू कागदे

बीड। प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मामुळे उपेक्षितांची हजारो वर्षाची गुलामगीरी नष्ट झाली. पूर्वीच्या काळात दगडाला किमंत होती. परंतु माणसाला नव्हती. हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील उपेक्षीत समूहांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांची सामाजिक शैक्षणिक, आर्थिक व राजकिय प्रगती करण्यासाठी २ वर्ष ११ महीने १८ दिवस परिश्रम घेउन भारतीय संविधानाची निर्मीती करून तमाम भारतीयांना लोकशाही बहाल केली. भारतीय संविधानामुळेच आज या देशातील ३६ राज्य, १० धर्म व ६ हजार ५०० जाती ७५ वर्षापासून एकत्र बांधून ठेवलेल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विचारांचे विद्यापीठ होते. त्यांच्या कार्यामुळे, कर्तृत्वामुळे ते जगाचे प्रेरणा



स्त्रोत आहेत.असे प्रतिपादन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंती निमित्त कामखेडा, रूई, मोरगांव, नायगांव, खापर पांगरी या गावी केले.

पूढे बोलतांना कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३२ पदव्या संपादीत केल्या त्याचे जगातील ११ भाषावर प्रभुत्व होते. समाज बांधवांना सज्ञान करण्यासाठी ५ वृतपत्रे सुरू केली. शिक्षण सक्तीचे व मोफत करून शिक्षण स्वातंत्र्य दिले. उपेक्षीतांच्या मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मिलींद महाविद्यालय, सिध्दार्थ महविद्यालयाची उभारणी केली. मताचा अधिकार देवून तमाम भारतीयांना मतदार राजा बनविले. काळाराम मंदिर प्रवेश, चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन या सारखी मानवा - अधिकारांची आंदोलने उभी केली. रिजर्व बँकेची स्थापना केली. हिंदु कोड बील संसदेत मंजूर करुन स्त्रियांना शिक्षणासह सर्वच क्षेत्रात स्वातंत्र्य दिले. भारत हा शेती प्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक बाजूने मजबूत करण्यासाठी पंजाब राज्यात भाक्रा नांगल धरणाची निर्मीती करून नदीजोड प्रकल्पाची संकल्पना राबविली. अंधश्रद्धेत व कर्मकांडात अडकलेल्या उपेक्षीत समूहांना बुद्ध धम्माचा मार्ग दिला. भारताचे संविधान लिहून सर्व मानव जातीचा उध्दार केला. त्यामुळे प्रत्येकांच्या आयुष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उपकार आहेत. ते कधीही फेडता येणार नाहीत. एवढे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. त्यामुळे १४ एप्रिल हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याला व कर्तृत्वाला अभिवादन करण्याचा दिवस आहे. यावेळी राजु जोगदंड, किसन तांगडे, बापू पवार, प्रशांत वासनिक, विक्रम शेंडगे, किरण वाघमारे, रवि वाघमारे, कालीदास नवळे, गणेश पगारे, प्रमोद शिंदे, धम्मा पारवेकर, रणजीत सिनगारे, महेश कागदे, संजय कवठेकर, सिध्दार्थ वाघमारे, संदिप कवठेकर किरण वाघमारे, बाळासाहेब गव्हाणे, संतोष जाधव, गोविंद जाधव, अशोक जाधव, शेख बिलाल, शेख शफीक, नामदेव वाघमारे, रतन वाघमारे, विनोद शेजवळ, आकाश वाघमारे, प्रदिप थोरात, विशाल वाघमारे, यांच्यासह शेकडो अनुयायी उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.३ मे २०२५


# जिल्ह्यात 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू'

## अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद, अभियान कालावधीत ओल्या कचऱ्यापासून बनविणार खत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात ओडीएफ प्लस मॉडेल झालेल्या ५७२ ग्रामपंचायतीमध्ये जवळपास २५०० नाडेप खत खड्डे सुविधा तयार करण्यात आलेल्या आहेत. घनकचरा व सांडपाणी या उपक्रमात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर होण्याकरिता गावातील ग्रामस्थांमध्ये स्वच्छते विषयक वर्तणुकीत बदल घडवून आणणे, सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचे महत्व पटवून देणे, घनकचरा व्यवस्थापनात्त सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करण्याच्या उदेश्याने कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू! अभियानात अकरा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायती महाराष्ट्र दिनी या





उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. केज तालुक्यात खासदार बजरंग सोनवणे, तर अंबाजोगाई तालुक्यात आमदार श्रीमती नमिता मुंदडा, बीड तालुक्यात विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र मोराळे , यांच्यासह सर्व गटविकास अधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

गावात निर्माण करण्यात आलेल्या नाडेप खड्ड्याच्या माध्यमातून सेंद्रिय कचऱ्याचे व्यवस्थापन करून खत निर्मिती करण्याकरीता राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे वतीने ''कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू !'' अभियान राबविण्याच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. दि. ०१ मे ते दि. ३० सप्टेंबर २०२५ (मे ३१, जुन ३०, जुलै ३१ ऑगस्ट ३१, सप्टेंबर १५ असे एकूण १३८ दिवस) पर्यंत ही मोहीम राबविण्यात येत आहे.

### अभियानाची प्रचार व प्रसिध्दी, समुदाय सहभाग व श्रमदान

जास्तीत जास्त गावामंध्ये ही मोहीम राबविण्यासाठी १ मे पासून सुरू होणाऱ्या याअभियानाची प्रचार प्रसिध्दी करण्यात आली. अभियानाकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी, संस्था, बचतगट महिला व शेतकरी गटांचा सहभाग घेऊन गावपातळीवर श्रमदान उपक्रम राबवून जनसहभाग घेतला आहे.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून दि. ०१ मे २०२५ ला कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू! या मोहिमेचा शुभारंभ ओ डी एफ प्लस घोषित झालेल्या सर्वच ग्रामपंचायतींमध्ये करण्यात आला आहे. दि. ०१ मे ते दि. १० मे या पान ३ वर

### अभियानाची सूचना व पुर्व तयारी

राज्यस्तरावरून मिळालेल्या निर्देशानुसार, गटविकास अधिकारी, पं.स. स्तरावर ग्राम पंचायत अधिकारी यांची कार्यशाळा, बैठक आयोजित केल्या होत्या. त्यानंतर ग्राम पंचायत अधिकारी यांनी ग्रामस्थांना माहिती दिली . तसेच गावात दवंडी देखील दिली आहे. ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, सोसायटी कार्यालय, तलाठी साज्जा कार्यालयाच्या सूचना फलकावर या अभियानाची माहिती प्रसारित करण्या बाबत यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. या मोहिमेच्या माध्यमातून ग्रामस्तरावर नाडेपद्वारे खत निर्मिती होईल. घनकचरा व्यवस्थापनात सुधारणा व पर्यावरणपूरक उपाययोजना करण्यासाठी, कचरा कमी करणे, पुनर्वापर करणे, याबाबत जनजागृती तसेच मानसिकता बदलण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहे.




संत बाळूदेव महाराज विद्यालय येथे ध्वजारोहण पाटोदा प्रतिनिधी –:१ मे महाराष्ट्र दिन आनंद चॅरिटेबल ट्रस्ट आष्टी संचलित संत बाळू महाराज विद्यालय व महिला महाविद्यालय पाटोदा येथे दत्ता देशमाने ( माणुसकीची भिंत चे सचिव )यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना गुणपत्रकाचे वाटप संजय कांकरिया (प्रतिष्ठित व्यापारी) यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक बोखरे सर, प्राचार्य आविळे सर व सर्व शिक्षक कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## शेख खय्युम यांचे निधन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील प्रियदर्शनी टायर्स चे सर्वेसर्वा तथा एजन्सी धारक शेख खय्युम (अध्यक्ष) त्यांचे सायंकाळी ७ च्या दरम्यान अस्वस्थ वाटू लागल्याने बीड येथे उपचारासाठी घेऊन जात असतानाच हदयविकाराचा तिव्र झटका आल्याने पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथे घेऊन जात असताना शहागड दरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली हि वार्ता पाटोदा तालुक्यात पसरताच शोककळा पसरली होती.



खय्युम शेख हे सर्व समावेशक चेहरा म्हणून तालुक्यात प्रसिद्ध होते. प्रत्येक सामाजिक कार्यात हिरारीने सहभाग घेत असल्याने सर्वच समाजात त्यांना मानणारा मोठा वर्ग असुन त्यांच्या अकाली निधन वार्तने हळहळ व्यक्त व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्यावर पाटोदा येथील हजरत राज दर्गावाली कब्रस्तान येथे दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हजारो नागरिकांच्या उपस्थितीत दफनविधी करण्यात आले.

## विनोद सक्राते पद्मश्री डॉक्टर मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

बीड येथील सुपुत्र आणि सध्या पुण्यातील मतिमंद निवासी विद्यालय मांजरी बुद्रुक पुणे या शाळेमध्ये क.लिपिक या पदावर कार्यरत असलेले व समाज कल्याण विभाग पुणे जिल्हा परिषद पुणे येथे अनेक वर्षे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले श्री विनोद भागवतराव सक्राते यांना दिव्यांग शाळा व कर्मशाळा मानसिक रुग्णालये यांचे कामकाज अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडत असल्यामुळे व सामाजिक कामांमध्येही



उल्लेखनीय कार्य केल्याबाबत हा पद्मश्री डॉक्टर मनीभाई देसाई राष्ट्रसेवा पुरस्काराचे पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.पद्मश्री डॉक्टर मनीभाई देसाई प्रतिष्ठान उरुळी कांचन पुणे, निती आयोग भारत सरकार सलग्नित तसेच महाराष्ट्र राज्य राष्ट्रसेवा समितीच्या विद्यमाने निष्काम कर्मयोगी सेवावृत्ती कार्यकर्त्यांना दरवर्षी पद्मश्री डॉक्टर मनीभाई देसाई पान ३ वर

## वस्त्या अस्तित्वात नसतांना तीस लाखांचा अपहार केल्याचा उपोषणकर्त्याचा आरोप

### धुनकवाड येथील पाराराम यादव यांचे आमरण उपोषणास अनेक ग्रामस्थांचा पाठिंबा

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील धूनकवड नं. १ व २ मध्ये सदरील ग्रामपंचायत मधील सरपंच व ग्रामसवक यांनी अस्तित्वात नसलेल्या बोगस वस्त्या दाखवत अश्या वस्त्या दाखवून तीस लाखाचा अपहार केल्याचा आरोप करत ग्रामपंचायत कार्यालय येथे उपोषणकर्त्यांने केला आहे पाराराम यादव यांनी दि.१.मे रोजी आमरण



उपोषण सुरू केले आहे.

गावातील पाराराम यादव यांनी गावातील विकासात्मक कामे बोगसरीत्या करून सदरील सरपंच ग्रामसेवक यांनी कांगने वस्ती, धनगर वस्ती, अहिल्याबाई होळकर वस्ती, वंजार वस्ती अश्या बोगस वस्त्या दाखवून हायमस्ट पथदिवे बसविले असल्याचा समजताच यादव यांनी माहिती अधिकार अर्जा मार्फत धूनकवाड मध्ये धनगर वस्ती, कांगने वस्ती व अहिल्याबाई होळकर वस्ती यांची कोणत्या वर्षी नोंद पान ३ वर

## मुलींच्या संरक्षणाबाबतची मनातील भिती दुर होण्याचे काम शिबिरातून होईल–आ.नमिता मुदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कुठल्याही पालकाच्या मनात मुलींच्या संरक्षणा साठीची भिती असते ही भिती दुर करण्याचे काम अशा शिबीराच्या माध्यमातून निश्चित होईल आणि त्या आत्मनिर्भर बनतील असे मत केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी व्यक्त केले. त्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आणि श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराच्या




उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते व्यासपीठावर सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक आर. व्ही. सोनवळकर, लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला, प्राचार्य डॉ. एम.व्ही. कानेटकर, मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आ.मुंदडा म्हणाल्या की, योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गतच्या या शिबीरासाठी मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात असून समाजभान जागृत होण्यासाठी आणि इथे शिकलेल्या गोष्टींचा भविष्यात वापर करण्यासाठी या शिबीराची सुरुवात झाल्याचे सांगून किशोरवयीन मुलांसाठीही एखादे शिबीर सुरू करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रूक्साना मुल्ला म्हणाल्या की, सोळा वर्षाचे वय म्हणजे आत्मभान येण्याचे वय असून पुढे मला पान ३ वर

## चोरी करण्याच्या उद्देशाने लपून बसल्याच्या आरोपातून मुंजा पांचाळसह इतराची निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

चोरी करण्याच्या उद्देशाने दि.८ जानेवारी २०१८च्या रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास निपाणी टाकळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जिप क्र.एम एच ३० बी १८४९ महिंद्रा कमांडर मध्ये लपून बसल्याच्या आरोपातून आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ, समाधान पांडुरंग पौळ यांची आरोपीचे विधिज्ञॲड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील दुसरे सत्र न्यायाधीश श्री धर्माधिकारी साहेब यांनी दि. ३० एप्रिल रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.



जानेवारी २०१८च्या रात्री १:३० वाजण्याच्या सुमारास निपाणी टाकळी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जिप क्र.एम एच ३० बी १८४९ महिंद्रा कमांडर मध्ये लपून बसल्याची फिर्याद मुंबई पोलीस कायदा कलम१२२ प्रमाणे आरोपी मुंजा रखमाजी पांचाळ व समाधान पांडुरंग पोळ यांच्या विरोधात दि.९जानेवारी २०१८रोजी सहाय्यक फौ.भास्कर शंकरराव कांबळे यांनी पो.स्टे.माजलगाव ग्रामीण येथे फिर्याद दिली होती, पान ३ वर

## येल्डा येथे वृद्ध महिलेचा दगडाने ठेचून खून

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे आज सकाळी एका वृद्ध महिलेचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृत महिलेचे नाव चोत्राबाई भानुदास सोन्नर (वय अंदाजे ७२ वर्षे) असे असून याप्रकरणी त्यांच्या मुलावरच संशयाची सुई आहे.

प्राथमिक माहितीनुसार, चोत्राबाई यांचा खून दगडाने ठेचून करण्यात आला असून, ही घटना आज सकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी करण्यात येत आहे. याप्रकरणी पोलिसांनी चोत्राबाई यांचा मुलगा अमृत भानुदास सोन्नर यास ताब्यात घेतले असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे येल्डा गावात खळबळ उडाली आहे.

## श्रामणेर शिबिरात जास्तीत जास्त धम्म उपासकांनी सहभागी व्हावे –डॉ.साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती च्या निमित्तान सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे बौद्ध धम्माच्या प्रचार प्रसारासाठी प्रशिक्षित उपासक निर्माण करुण धम्म चळवळ गतीमान करण्यासाठी दि ३ मे २०२५ वार शनिवार ते १० में २०२५ वार सोमवार या १० दिवसाच्या कालावधीत बौद्धाचार्य श्रामणेर शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे त्या साठी तालुक्यातील धम्म उपासकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बौद्ध धम्माचा प्रचार प्रसार करणे हे आपले कर्तव्य आहे हे लक्षात घेऊन बौद्ध धम्माच्या प्रचार प्रसार करण्यासाठी स्वत: व इत्तर परिसरातील उपासकांना प्रर्वत करणे हे आपले काम आहे तरी संस्थेचे पदाधिकारी, व तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील धम्म उपासकांनी जास्तीत जास्त नाव नोंदणी करुण सहभाग नोंदवून धम्म चळवळ गतिमान करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे यांनी केले आहे



नाव नोंदणी साठी संपर्क:– आयु.सिद्धार्थ वक्ते, मो.९५२७८७४५४८ गुलाब धाईजे, मो.८६०५३०५५८५ दयानंद साळवे ,मो ९४२३७२८७८२

## परळी न्यायालयाची नवीन इमारत पर्यावरणपूरक व्हावी – ना. पंकजाताई मुंडे

### न्यायालयाच्या इमारत बांधकामाचे थाटात भूमिपूजन

### सोशल मीडियातील फेक अकाउंटवर आळा घालण्यासाठी कडक कायदा होण्याची गरज

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची नूतन इमारत पर्यावरणपूरक व्हावी, यासाठी जे काही सहकार्य लागेल ते आपण निश्चितपणे करू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले. इमारतीसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यात यावा. निर्माणाधीन इमारतीवर पाण्याचे रिसायकलिंग करण्याची पान ३ वर



## जिल्ह्यात शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ

बीड । प्रतिनिधी

पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. २ मे रोजी बीड जिल्हा शिवसंग्रामच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करत



या सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उदंड प्रतिसाद मिळत असून जिल्ह्यासाठी दिलेले सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी केला.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेल्या शिवसंग्राम संघटन सर्वोपरि या विचारधारेने कार्य करणाऱ्या संघटनेत लोकशाही असून सामुहिक निर्णय आणि परस्पर संवाद ही दोन वैशिष्ट्ये आहेत. संघटनशक्तीला बळ देण्यासाठी पक्ष कार्यकर्ते, पदाधिकारी झोकून देऊन काम करत असल्याबद्दल शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी कौतुक केले. या अभियानासाठी पक्ष संघटना, कार्यकर्ते काम करत आहेत. पुढील महिनाभर हे अभियान राबवणार आहेत. जिल्ह्यात पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज आणि कॉल, पुण्यातील आरोपीला बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

मंत्री आणि भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज पाठवून आणि कॉल करुन त्रास देणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. अमोल काळे असं आरोपीचं नाव असून तो पुण्याचा आहे. गेल्या काही दिवसांपासून तो पंकजा मुंडेंना कॉल आणि मेसेजद्वारे त्रास देत होता. या प्रकरणी पंकजा मुंडे यांच्या कार्यालयाने सायबर पोलिसात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी बीएनएसच्या कलम ७८ आणि ७९ तसंच आयटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. सायबर पोलिसांनी भोसरी पोलिसांच्या मदतीने आरोपी अमोल काळेला अटक केली.



आरोपी अमोल काळे पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज आणि कॉल करुन त्रास देत होता. याप्रकरणी पंकजा मुंडे यांच्या कार्यालयाकडून जवळच्या सायबर पोलीस स्थानकांत संपर्क करुन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी बीएनएसच्या कलम ७८ आणि ७९ तसेच आयटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आणि पुढील तपास सुरू केला. त्यानंतर सायबर पोलिसांनी भोसरी पोलिसांच्या मदतीने आरोपी अमोल काळेला अटक केली.

अमोल काळे (२५) पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज आणि कॉल करुन त्रास देत होता. याप्रकरणी पंकजा मुंडे यांच्या कार्यालयाकडून जवळच्या सायबर पोलीस स्थानकांत संपर्क करुन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आणि फोन करणाऱ्याचे ठिकाण शोधले आणि तो पुण्यातील भोसरी असल्याचे आढळून आले. यानंतर, सायबर पोलिसांनी भोसरी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने आरोपी अमोल काळे याला अटक केली. चौकशीत काळेने पंकजा मुंडे यांना फोन केल्याची कबुली दिली. अमोल काळेला न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. एका सायबर अधिकाऱ्याने सांगितले की, आरोपी हा विद्यार्थी आहे आणि त्याने अपशब्द वापरण्यामागील आणि त्रासदायक वर्तनामागील हेतू सध्या तपासला जात आहे. मात्र, त्याला पुण्यातील भोसरी येथून अटक करण्यात आली. आरोपी अमोल काळे हा महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील परळी येथील रहिवासी आहे.

# श्री छत्रपती कारखान्यात अजित पवार -पृथ्वीराज जाचकांचे अखेर जमले; श्री जय भवानी माता पॅनल जाहीर

**भवानीनगर । प्रतिनिधी**

श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अनेक राजकीय घडामोडीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पृथ्वीराज जाचक यांचे सूर जमले असून सर्वपक्षीय श्री जय भवानी माता पॅनल जाहीर करण्यात आला आहे. सर्वपक्षीय पॅनल जाहीर करण्यासाठी मागील तीन-चार दिवसापासून राजकीय घडामोडी सुरू होत्या उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, साखर संघाचे माजी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांच्यामध्ये पॅनलच्या जागा वाटपावरून राजकीय नाट्य सुरु होते.

गुरुवारी संध्याकाळी पवार भरणे व जाचक यांची बैठक झाल्यानंतर पॅनलच्या जागा




निश्चित करण्यात आल्या व शुक्रवारी सकाळी १० वाजता श्री जय भवानी माता पॅनल जाहीर करण्यात आले. श्री जय भवानी माता पॅनल मधून लासुर्णे या गट क्रमांक एक मधून पृथ्वीराज साहेबराव जाचक, जामदार शरद शिवाजी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सणसर गट क्रमांक दोन मधून निंबाळकर रामचंद्र विनायक व निंबाळकर शिवाजी रामराव यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

उद्धट या गट क्रमांक तीन मधून घोलप पृथ्वीराज श्रीनिवास व कदम गणपत सोपान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अंथुर्णे या गट क्रमांक चार मधून शिंगाडे विठ्ठल पांडुरंग दराडे प्रशांत दासा नरुटे अजित हरिश्चंद्र यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. सोनगाव या गट क्रमांक पाच मधून अनिल सिताराम काटे बाळासाहेब बापूराव कोळेकर व संतोष शिवाजी मासाळ यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

गुणवडी या गट क्रमांक सहा मधून कैलास रामचंद्र गावडे सतीश बापूराव देवकाते व निलेश दत्तात्रय टिळेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

ब वर्ग सहकारी उत्पादक बिगर उत्पादक संस्था यामधून पाटील अशोक संभाजीराव यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. अनुसूचित जाती जमाती या प्रवर्गामधून मंथन बबनराव कांबळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. महिला राखीव प्रतिनिधी प्रवर्गातून सौ राजपुरे माधुरी सागर व सौ सपकळ सुचिता सचिन यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. इतर मागास प्रवर्गातून शिंदे तानाजी ज्ञानदेव व भटक्या विमुक्त जाती व जमाती विशेष मागास प्रवर्गातून डॉ श्री पाटील योगेश बाबासाहेब यांना उमेदवारी जाहीर करण्यात आले आहे.

# पुणे जिल्ह्यात 'एक गाव, एक पोलिस' योजनेची सुरुवात; १ हजार ५७४ गावांमध्ये प्रभावी पोलिसींग

**पुणे । प्रतिनिधी**

गावागावात पोलिस आणि नागरिकांमधील परस्परसंबंध अधिक दृढ करून गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने पुणे ग्रामीण पोलिस दलाने 'एक गाव, एक पोलिस पाटील, एक पोलिस अंमलदार' या नावीन्यपूर्ण योजनेची अंमलबजावणी केली आहे. या उपक्रमाची सुरूवात १ मे रोजी करण्यात आली असून, पुणे ग्रामीण जिल्ह्यातील संपुर्ण १ हजार ५७४ गावांमध्ये ही योजना प्रभावीपणे राबविली जाणार आहे.

पोलिस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण यांच्या नेतृत्वाखाली ही योजना



राबविण्यात येत असून, यामध्ये १३ तालुके, ३३ पोलिस स्टेशन आणि १ हजार ५७४ गावे व बर्याच वाड्या वस्ताही सामाविष्ट आहेत. पोलिस ठाण्यांतून निवड करण्यात आलेल्या गावांमध्ये प्रत्येक गावासाठी एक पोलिस पाटील आणि एक पोलिस अंमलदार नियुक्त केले गेले आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश संबंधीत गावातील माहिती संकलन, जलद प्रतिसाद, तसेच नागरिकांशी थेट संवाद प्रस्थापित करणे हा आहे.

महिला सुरक्षेसाठी तसेच सायबर गुन्ह्यांविरोधातील जनजागृती यावर योजनेचा विशेष भर राहणार आहे. योजनेचा उद्देश समुदाय पोलीसिंग अधिक सक्रीयपणे राबविणे आणि गावपातळीवरच संभाव्य गुन्ह्यांचे प्रतिबंध करणे असा आहे. पोलिसांचा जनतेशी संवाद वाढावा, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ व्हावा आणि गावकरी देखील पोलिस यंत्रणेचा भाग बनावेत अशी कल्पना या योजनेतून प्रत्यक्षात आणली जात आहे.

# दौंड येथील विनोद नरवार खूनप्रकरणी १२ जणांना जन्मठेप

## बारामती न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने आज खून खटल्यात ऐतिहासिक निकाल देत ४ सख्खे भाऊ, ३ महिलांसह १२ जणांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

दौंड येथील विनोद नरवार यांची ३ मे २०१८ रोजी हत्या झाली होती. विनोद नरवाल त्यांच्या दुचाकीवरुन निघाले असताना अनोळखी लोकांनी तलवार, कोयता, लोखंडी पाईप, काठ्या, फरशीचे तुकडे, दगडांनी बेदम मारहाण केली. फिर्यादी व विनोद यांच्या पत्नी मीना नरवाल यांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, रूग्णालयात नेताना त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी दौड पोलिसांत १२ जणांविरुध्द गुन्हा दाखल झाला होता.

अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश श्रीमती एस.आर. पाटील यांच्या समोर हा खटला चालला. सरकारच्या वतीने विशेष सरकारी वकील अॅड. प्रसन्न जोशी यांनी काम



पाहिले. ८ साक्षीदारांची साक्ष या खटल्यात महत्वाची ठरली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पुरावे व न्यायवैदयकीय पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने १२ जणांना जन्मठेप व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या दंडाची ५ लाखांची रक्कम मीना नरवाल यांना देण्याचेही आदेश न्यायालयाने दिलेले आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्टफोन आणि संगणक प्रशिक्षण

**पुणे । प्रतिनिधी**

तुम्ही ज्येष्ठ नागरिक आहात? आणि मनात स्मार्टफोन/मोबाईल वापराची भीती आहे? नातवंड किंवा मुलांना तुम्हाला मोबाईल शिकवण्यासाठी वेळ नाही? आजच्या डिजिटल युगात मोबाइल शिकण्यासाठी, हाताळण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी, कुटुंब आणि मित्रांशी संवाद साधण्याची, वेब ब्राउझ करण्याची किंवा नवीन इंटरनेट एक्सप्लोर करण्याची अद्भुत संधी सोडू नका !

ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्टफोन आणि संगणक प्रशिक्षण वर्ग सिम्बायोसिस संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय आणि स्मारक, सेनापती बापट रोड, पुणे यांच्या मार्फत आयोजित केला आहे.



मोबाइलचा दैनंदिन जीवनातील वापरासंदर्भात ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करणे हाच या प्रशिक्षण वर्गाचा मुख्य उद्देश आहे. ज्येष्ठ नागरिकांना ज्याप्रकारे मोबाईल फोन कळेल अशा सोप्या प्रादेशिक भाषेत,अनुभवी प्रशिक्षक प्रत्येक पायरीवर मार्गदर्शन करतील अशी या प्रशिक्षण वर्गाची रचना करण्यात आली आहे.

प्रशिक्षण वर्ग म्हणजे डिजिटल इंडियाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असून जेष्ठांना स्मार्ट फोनचा वापर, सामान्य फसवणूकीपासून सावधगिरी, तसेच ओटीपी, पासवर्डची सुरक्षितता, व्हिडिओ रेकॉर्डिंग, फोटो काढणे, पीडीफ फाईल बनवणे,ऑनलाईन पेमेंट अँपचा वापर, गॅस/कॅब बुकिंग, वीजबिल भरणे, बस व विमान तिकिट/पुणे मेट्रो तिकीट बुकिंग, हॉटेल बुकिंग अँप शिकवले जाते.

# शहरातील ३२३ रस्त्यांच्या रुंदीबाबतचा 'तो' प्रस्ताव सादर करण्याचे पुणे महापालिकेला आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील ३२३ रस्त्यांची रुंदी सहा मीटरवरुन ९ मीटर करण्याचा प्रस्ताव रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करा, असे आदेश राज्य सरकारने पुणे महापालिकेला दिले आहेत. यामुळे या रस्त्यांवर परवानगी देण्यात आलेल्या बांधकामांचे काय होणार? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुणे शहरातील सहा मीटर रुंदीच्या रस्त्यालगतच्या बांधकामासाठी टीडीआर वापरण्यास २०१५ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनाई केली होती. त्याऐवजी युडीसीपीआरमध्ये तरतूद करून सहा मीटरच्या रस्त्यावर पुनर्विकासासाठी आवश्यक असणारा एफएसआय (एफएसआय) वापरण्यास त्यांनी परवानगी दिली होती. परंतु, महापालिकेने या रस्त्यांचे रुंदीकरण करण्याचा प्रस्ताव तयार केला होता.

यातील बहुतेक रस्ते हे टाऊन प्लॅनिंग स्कीम (टिपी स्कीम) मध्ये आहेत. त्यामुळे या रस्त्यांचे रुंदीकरण केले तर अनेक अडचणी




निर्माण होतील, असा दावा 'आपले पुणे' या संस्थेचे उज्ज्वल केसकर, प्रशांत बधे, सुहास कुलकर्णी यांनी घेत रुंदीकरणाला विरोध केला होता. तसेच मुळात या विषयाचा ठराव कलम २१० प्रमाणे झालेला नाही, हा ठरावच मुळात बेकायदेशीर आहे, असा दावाही त्यांनी केला होता.

याप्रश्नासंदर्भात २०२० साली तत्कालीन पालकमंत्री अजित पवार यांनी बोलाविलेल्या बैठकीत काही निर्णय घेतले गेले होते. या रस्त्यांवर पूर्वीप्रमाणे सहा मीटरच्या रस्त्यावर टीडीआर अनुज्ञेय करायचा, जी जागा पुनर्विकासासाठी येईल, तेव्हा रस्ता रुंदीकरणासाठी दीड मीटर जागा ताब्यात घ्यायची, काही प्लॉट अनबिल्डेबल व्हायला नको म्हणून रस्ता रुंदी साठी घेतलेले दीड मीटर फ्रंट मार्जिनमधून वगळायचे अधिकार आयुक्तांना द्यायचे असे ठरले होते.

या निर्णयावर कोणतीही कार्यवाही न करता महापालिका प्रशासनाने पुन्हा हे रस्ते नऊ मीटर रुंद करण्याचा प्रस्ताव तयार केला होता. राज्य सरकारने हा प्रस्तावच रद्द करण्याचा प्रस्ताव पाठवावा असे आदेश महापालिकेला दिले आहेत, अशी माहिती केसकर यांनी दिली. यासंदर्भात केसकर यांनी महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांना निवेदन देऊन काही मागण्या केल्या आहेत. या रस्त्यांवर रुंदीकरण होणार म्हणून बांधकाम केलेल्यांची यादी तयार करावी, तसेच बांधकाम निरीक्षकांना या रस्त्यांवरील बांधकामासंदर्भात वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

# पुण्यात भर रस्त्यावर कोयत्याने तुफान हाणामारी; CCTV फुटेजमुळे भांडणाचा थरार समोर, ४ कुख्यात गुन्हेगारांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील बिबवेवाडी परिसरात गुन्हेगारीचा थरार अनुभवायला मिळाला. १७ एप्रिल रोजी भर रस्त्यावर कोयत्याने झालेल्या तुफानी हाणामारीनं नागरिकांची झोप उडवली. या घटनेचा थरार सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आला असून, पुणे पोलिसांनी या घटनेतील चार कुख्यात गुन्हेगारांना अटक केली आहे.

अटकेत आलेल्या आरोपींची नावे सुरज भिसे, सुमित भिसे, आदित्य पवार आणि सतीश पवार अशी आहेत. हे सर्वजण पुण्यातील सराईत गुन्हेगार म्हणून ओळखले जातात. या चौघांनी यापूर्वीही कोयत्याचा वापर करून दहशत निर्माण केली होती. स्थानिक नागरिकांच्या तक्रारी आणि आधीच्या गुन्हेगारी नोंदींमुळे पोलिसांनी विशेष तपास सुरू केला होता.

घटनेनंतर लगेचच बिबवेवाडी पोलीस स्टेशनने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज




तपासले. त्यातून आरोपींनी कोयत्याने भर रस्त्यावर केलेली हाणामारी स्पष्टपणे समोर आली. या फुटेजच्या आधारे पोलिसांनी सखोल तपास करत चारही आरोपींना अटक केली.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींना तात्काळ न्यायालयात हजर केलं. न्यायालयाने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळून त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, आरोपींचा गुन्हेगारी इतिहास लक्षात घेता त्यांना जामीन दिल्यास ते पुरावे नष्ट करू शकतात किंवा पुन्हा गुन्हा करु शकतात.

या प्रकरणाचा पुढील तपास बिबवेवाडी पोलीस करत आहेत. घटनेमागचं नेमकं कारण काय होतं, हे शोधण्यासाठी पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. तसेच आरोपींच्या मोबाईल तपासणीद्वारे कोणत्या टोळीशी त्यांचा संबंध आहे का, हे शोधलं जात आहे.

या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. नागरिकांनी पोलिसांकडे सुरक्षा वाढवण्याची मागणी केली आहे. याचसोबत पोलिसांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. पोलिसांनी नागरिकांना अशा प्रकारच्या गुन्हेगारी हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचं आवाहन केलं आहे. सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यावर भर देण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सतर्क राहण्याच्या सूचना; पुणे पोलिसांनी लॉज मालकांना केलं आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पुणे पोलिसांच्या लॉज मालक आणि चालक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. लॉज येथे रहावयास येणारे सर्व ग्राहकांची कागदपत्रे व्यवस्थितपणे तपासून रजिस्टरमध्ये नोंद करा अशी महत्त्वाची सूचना पोलिसांनी लॉजचे मालक- चालक यांना करण्यात आली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या अनुषंगाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून हडपसर पोलीस स्टेशन हद्दीतील लॉजचे मालक चालक यांची बैठक घेण्यात आली होती.

पुणे पोलिसांच्या परिमंडळ ५ कडून हडपसर पोलीस स्टेशन हद्दीतील लॉज मालक आणि अधिकारी यांची बैठक पार पडली. लॉजवर राहण्यासाठी येणारे परदेशीय नागरिक यांचे सी फॉर्म भरून त्यांचे पासपोर्ट व व्हिजा यांच्या कॉपी घेऊन त्या रजिस्टरला नोंद करावी





अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत. लॉजचे प्रवेशद्वारावर व सभोवती येणारे जाणारे रस्ते कव्हर होतील अशा पद्धतीने एचडी व नाईट विजन कॅमेरे बसवण्यात यावेत अशा सूचना पोलिसांनी दिल्या आहेत. लॉजमध्ये संशयित इसम आढळून आल्यास तात्काळ पोलीस कंट्रोल रुमला कळवा, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे. पुणे पोलिसांच्या परिमंडळ ५ पोलीस उपयुक्त राजकुमार शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर हडपसर पोलीस ठाण्यात या अंतर्गत येणाऱ्या सर्व लॉजच्या मालक आणि चालक यांच्यासोबत काल आम्ही बैठक घेतली. या बैठकीत आम्ही त्यांना काही मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्या त्यांनी पाळणं बंधनकारक आहे, याबाबत माहिती दिली. त्यांच्या लॉजमध्ये येणारे सर्व नागरिकांची कागदपत्र तपासूनच त्यांना प्रवेश द्यावा तसेच परदेशी नागरिकांच्या प्रवेशाबद्दल सुद्धा त्यांचे सर्व कागदपत्र आणि पासपोर्ट सोबत असलेला व्हिजाची पडताळणी करून घेतल्यानंतरच त्यांना प्रवेश दिला जाईल याची खात्री करावी, असंही पोलिसांनी यावेळी म्हटलं आहे.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. यामध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा मृत्यू झाला आहे. यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानी नागरिकांचे सर्व शॉर्ट टर्म व्हिजा रद्द केले होते. याच पार्श्वभूमीवर पुण्यातील तीन पाकिस्तानी नागरिकत्व असणाऱ्यांना आता परत पाठवण्यात आला आहे. हे तिन्ही पाकिस्तानी नागरिक पुण्यातील कोंढवा परिसरात काही दिवसांपासून वास्तव्यास होते. यातील एक जण हा त्याच्या नातेवाईकाकडे राहण्यासाठी आला असल्याचं समोर आलं आहे.

# पीडीसी बँकेतर्फे शेतकऱ्यांना होणार ५० कोटींचे कर्ज वाटप

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांना पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (पीडीसी), शेती विकास सोसायट्यांच्या माध्यमातून ५० कोटी रुपयांचे खरीप पिक कर्ज वाटप करणार आहे. अशी माहिती पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक माऊली दाभाडे यांनी दिली.

मावळ तालुका हा अति पावसाळी व खरीप पिकासाठी अग्रेसर असलेला तालुका आहे. या तालुक्यात खरीप भात पीक प्राधान्याने मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. या खरीप भात पीकाखाली एकूण १३ हजार हेक्टर क्षेत्रात खरीप भात पीक व ३ हजार हेक्टर क्षेत्रात इतर खरीप पिके घेतली जातात. तालुक्यातील खरीप भात पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून शेती विकास सोसायट्यांच्या मार्फत मोठ्या प्रमाणात अर्थ सहाय्य दिले जाते. असे कर्ज वाटप १ एप्रिलपासून तालुक्यात सुरू करण्यात आलेले आहे.

तालुक्यात एकूण ५५ शेती विकास सोसायटया, गावोगावी असून या सोसायट्यांमार्फत शेतकऱ्यांना खरीप पिकासाठी कर्ज वाटप केले जाते. यावर्षी १ एप्रिलपासून आत्तापर्यंत ३ हजार ४६० शेतकऱ्यांना २८ कोटी ८ लाख रुपये कर्जाचे वाटप झालेले आहे. अशी माहिती पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मावळ तालुका विभागीय अधिकारी गुलाबराव खांदवे यांनी दिली.

खरीप पीक कर्ज मावळ तालुका सचिव संघटनेचे अध्यक्ष गणपत भानुसघरे, संजय ढोरे, गुलाब ढोरे, धनंजय विधाटे, बाळासाहेब सावंत,धर्मा ठोंबरे, संभाजी केदारी, दत्तात्रय वारींगे, सचिन भानुसघरे, सोमनाथ जाधव, किरण लोहोर, तुकाराम लोहोर, बन्सी राक्षे, सुनील गाडे, उमेश वाडेकर, तुषार गाडे, अंकुश पिंपरकर, अमोल भोईरकर, भाऊ फाटक, पांडुरंग गावडे, संपत आडकर, सोमनाथ वाळुंज,अंकुश टाकळकर, सोमनाथ गायकवाड आदी सचिवांमार्फत गावोगावी वाटप चालू आहे.